रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक २६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २ जुलै २०२४

किंमत ४ ₹


## दुचाकी चोराला केली अटक

**नेरळ:** नेरळ पोलीस ठाणे हद्दीमधून दुचाकी चोरणाऱ्याला नेरळ पोलिसांनी मुंबई, कुलाबा भागातून पकडले आहे. त्याच्याकडून चार दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. नेरळ येथील निर्माण नगरी सोसायटीच्या मोकळ्या जागेतील पार्किंग ठिकाणाहून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेली होती. त्याबाबत चिराग धुळे यांनी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. नेरळ पोलीस ठाण्याच्या पथकाने तांत्रिक पुरावा उपलब्ध नसताना आरोपी सचिन सुनिल सोनावण यास अटक केली असून ५ दुचाकी हस्तगत केल्या.

## विनयभंग करणाऱ्यास तीन वर्षांची शिक्षा

**अलिबाग :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला अलिबाग सत्र न्यायालयाने तीन वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच ३ हजार रुपयांचा दंडही ठोठावला. मोहन दीनानाथ चव्हाण असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश ए एस राजदेकर यांच्या विशेष न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी अतिरिक्त शासकीय अभियोक्ता म्हणून स्मिता धुमाळ पाटील यांनी काम पाहिले. सुनावणी दरम्यान २७ जणांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. दोन्ही बाजूचे पान २ वर

**आजचा अग्रलेख**
**बावीस हातांचा विजय**

**वे|ध|क**

### ताम्हिणी घाटात तरुण बुडाला

**पुणे :** लोणावळ्यात एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेल्याची घटना रविवारी घडली होती. ही घटना ताजी असतानाच ताम्हिणी घाटात एक तरुण वाहून गेल्याची घटना घडली आहे. स्वप्नील धावडे असे वाहून गेलेल्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. या घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा तरुण आपल्या जिममधील ३२ जणांच्या ग्रुपसोबत ताम्हिणी घाटात फिरण्यासाठी गेला होता, अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे. ताम्हिणी घाटात गेलेल्या स्वप्नील धावडेने पाण्यात उडी मारल्यानंतर तो जोरदार प्रवाहात बेपत्ता झाला.

### २१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नागोठणे :** नागोठणे पोलिसांनी दोन दिवसात दोन वाहनांवर कारवाई करीत जनावरांची वाहतूक करणाऱ्या दोघांसह एक आयशर टेम्पो, एक पिकअप जीपसह चोरीच्या १४ म्हैशी व ५ गाईंसह एक बैल जप्त केला आहे. उपलब्ध माहितीनुसार, २८ जून रोजी मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणे, कामत हॉटेलजवळ संदीप महिपाल पाल (वय ४१, रा. कर्चलपुर, पो. बिजावली, ता. औंध, जि. फतेहपुर, उत्तर प्रदेश) सध्या रा. विरार रेल्वे स्टेशनजवळ, हा पिकअप जीपमध्ये ५ गाय व १ वासरू यांना दाटीवाटीने भरून निर्दय व क्रूरपणे वाहतूक करीत होता. त्यातील एक गाय पिकअप जीपच्या खाली पान २ वर

## सभागृहात आमदार जयंत पाटील यांचे
# ‘मिशन’ जलजीवन

### पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली कबुली

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

**रायगड जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत अनेक कामे अपूर्ण असल्यामुळे रायगडकरांना पाण्याची टंचाई भासत आहे. याशिवाय ठेकेदारानेही निकृष्ट दर्जाची कामे केली असल्याबाबत शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांना धारेवर घेतले. अखेर पाणीपुरवठा मंत्र्यांनी अपुर्ण कामे असल्याची कबुली देत जिल्ह्यातील कामांची सद्यपरिस्थिती आ. पाटील यांना सांगत प्रलंबित कामे लवकरच करणार असल्याचे आश्वासन दिले.**

आ.पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधत पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्र सरकार पुरस्कृत रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्याचे सांगितले. गेल्या वर्षभरापासून या योजनांच्या कामांना सुरुवात करण्यात आली. १ हजार ४२२ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या. त्यापैकी ३१० योजनांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित १ हजार ११२ गावे अद्याप पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत. याशिवाय काही ठिकाणी कामे न करताच ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून बील काढण्यात आली आहेत. काही पान २ वर



| काय म्हणाले मंत्री? | | | |
|---|---|---|---|
| 1527 योजना मंजूर | 837 योजना अपूर्णच | 61 योजना अडचणीत | 16 योजनांची कार्यवाही सुरु |

## दीक्षाभूमीतील भूमिगत पार्किंगचा मुद्दा तापला

**| नागपूर | वृत्तसंस्था |**

नागपूरच्या दीक्षाभूमीतील भूमिगत पार्किंगचा मुद्दा चांगलाच तापला असून काही नागरिकांनी येथील पार्किंगच्या बांधकामाची तोडफोड केली आहे. या भूमिगत पार्किंगमुळे स्तुपाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, असा दावा दावा या नागरिकांनी केला आहे. दरम्यान, याठिकाणी पोलीस अधिकारी दाखल झाले असून कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

याप्रकरणावर आता राजकीय प्रतिक्रियादेखील उमटू लागल्या आहेत. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. दीक्षाभूमी, नागपूर येथील कुठलीही पार्किंगची मागणी नसताना ट्रस्टींनी त्याचा घाट घातला. याविरोधात जनता रस्त्यावर उतरली आहे. ट्रस्टींनी लोकांच्या भावनेशी खेळू नये, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले. पुढे बोलताना, आमचाही या पार्किंगला विरोध असून आंदोलनकारी जनतेच्या पाठीशी वंचित बहुजन आघाडी उभी आहे, अशी भूमिकाही त्यांनी स्पष्ट केली. दीक्षाभूमी, पान २ वर

> **“नागपूरमधील दीक्षाभूमी येथे विकासाचा आराखडा तयार करण्यात आला. त्यासाठी राज्य सरकारने २०० कोटी रुपये दिले. हा संपूर्ण आराखडा स्मारक समितीने सुचविल्याप्रमाणे तयार करण्यात आला आहे. त्यानुसारच भूमिगत पार्किंगचे काम स्मारक समितीमार्फत हाती घेण्यात आले होते. मात्र लोकभावना लक्षात घेता त्याला स्थगिती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एक बैठक घेऊन सर्वांच्या संमतीने निर्णय घेण्यात येईल. सर्वांचे मत विचारूनच त्यावर निर्णय घेण्यात येईल .**
> **–देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री”**

# सत्ताधारी-विरोधक आक्रमक

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत बोलताना केलेल्या वक्तव्यानंतर जोरदार गदारोळ झाला. राहुलगांधी यांनी लोकसभेत बोलताना म्हटलं की, नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात म्हटलं की हिंदुस्ताननं कधी कुणावर आक्रमण केलं नाही. याचं कारण आहे, हिंदुस्तान अहिंसेचा देश आहे. आपल्या महापुरुषांनी डरो मत, डराओ मत असं म्हटलं. भगवान शंकर म्हणतात डरो मत, डराओ मत आणि त्रिशुल जमीन रोवतात. हिंदू धर्मानं स्पष्टपणे म्हटलंय सत्याची साथ द्या. मात्र तुम्ही जे स्वत:ला हिंदू म्हणतात ते २४ तास हिंसा, नफरत सोबत ठेवतात. त्यामुळे तुम्ही हिंदू असूच शकत नाही. त्यांच्या या वक्तव्यानंतर भाजप नेते आक्रमक झाले.



### अयोध्येनं मेसेज दिला

**राहुल गांधी यांनी म्हटले, भगवान रामाच्या जन्मभूमीने भाजपला मेसेज दिला आहे. अवधेश प्रसाद यांच्याशी चर्चा केली. अवधेश प्रसाद यांनी निवडणुकीत जिंकणार असल्याचं माहिती आहे सांगितलेलं. जे-जे छोटे दुकानदार होते, छोट्या बिल्डींग होत्या, त्या सर्व पाडल्या गेल्या. अयोध्येत राम मंदिराच्या उद्घाटनावेळी अंबानी, अदानी होते पण तिथलं कोण नव्हतं, असंही ते म्हणाले.**

राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांनी आक्षेप घेतला.

राहुल गांधी पुढं बोलताना भारत जोडो यात्रेतील अनुभव सभागृहात माडले. महागाईनं महिलांच्या मनात भीती निर्माण केल्याचं म्हटलं. राहुल गांधींनी पुढे अग्निवीर आणि मणिपूरच्या मुद्यावरुन मोदी सरकारवर हल्लाबोल केला. नोटबंदी आणि जीएसटीच्या मुद्यावरुन देखील हल्लाबोल केला.

# शेतकऱ्यांच्या सन्मानावर आचारसंहितेचा अडथळा

### रायगड जिल्हा परिषदेचा शेतीनिष्ठ पुरस्कार लांबणीवर

**प्रमोद जाधव**
**| अलिबाग |**

शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करून उत्पादनात वाढ करणाऱ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी कृषी दिनानिमित्त शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार दिला जातो. मात्र यंदा शेतकऱ्यांच्या सन्मानावर आचारसंहितेचा अडथळा निर्माण झाल्याने हा सोहळा लांबणीवर गेला आहे. जिल्ह्यातील तीसहून अधिक शेतकऱ्यांना पुरस्काराची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

शेतकऱ्यांचा सन्मान व्हावा, यासाठी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी पुरस्कार देण्याचा निर्णय त्यावेळी घेतला. त्यानंतर माजी आ. पंडित पाटील अध्यक्ष असताना या सोहळ्याला मोठे स्वरूप प्राप्त झाले. शेतीवर नवनवीन प्रयोग करणारे, नवनवीन पिकांची लागवड करणारे तसेच आधुनिक सेंद्रिय शेतीवर भर देणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा दरवर्षी एक जुलैला शेतीनिष्ठ पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यामुळे जिल्ह्यातील खेड्यापाड्यात राहणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळाले. तरुणमंडळी शेतीकडे वळू लागली.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना यावर्षी कृषी दिनानिमित्त पुरस्कार देण्यासाठी तालुका स्तरातून नावांची यादी मागविण्यात आली. गेल्या अनेक महिन्यांपासून त्याचे काम सुरु होते. एक जुलैला पुरस्कार मिळणार म्हणून शेतकरीदेखील आनंदात होते. मात्र त्यांच्या या आनंदावर विरजन पडले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर कोकण पदवीधर मतदार संघातील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला. या कार्यक्रमामुळे एक जुलैला होणारा जिल्हा परिषदेचा शेतीनिष्ठ पुरस्कार सोहळा रद्द करण्यात आला.

> **“शेतकऱ्यांचा गौरव व्हावा यासाठी शेतीनिष्ठ पुरस्कार सोहळा जिल्हा परिषदेच्या वतीने सुरु केला. जिल्हा परिषद अध्यक्ष असताना,हा कार्यक्रम व्यापक स्वरुपात करण्यात आला. परंतु आचारसंहितेमुळे यंदाचा जिल्हा परिषदेचा कृषी निष्ठ पुरस्कार सोहळ्याचा कार्यक्रम होऊ शकला नाही. मात्र प्रशासनाने आचारसंहिता संपल्यावर तातडीने हा कार्यक्रम घेऊन शेतकऱ्यांचा सन्मान करावा, अशी मागणी होत आहे.**
> **– पंडित पाटील**
> **माजी आमदार, शेकाप”**

> **“जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीनिष्ठ पुरस्कार जिल्हा परिषदेच्या वतीने दिला जातो. परंतु आचारसंहितेमुळे हा कार्यक्रम होऊ शकला नाही. या दिवशी रोपांची लागवड करून शेतकऱ्यांमध्ये शेतीचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. वरिष्ठांच्या सुचनेनूसार हा पुरस्काराचा कार्यक्रम लवकरच घेतला जाईल.**
> **– कृषी विभाग, जिल्हा परिषद”**

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला
# दि.बा. पाटील यांचे नाव द्या

### अखिल भारतीय किसान सभेने केली मागणी



**| पनवेल | वार्ताहर |**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे आणि विमानतळ प्रकल्पबाधितांच्या प्रलंबित मागण्यांसाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कमिटी संलग्न अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने पनवेल ते मंत्रालयावर मोर्चाचे आयोजन सोमवारी (दि.१) करण्यात आले होते. यावेळी सर्व्हिस रोडवर पोलिसांनी मोर्चा अडवल्यानंतर आंदोलकांनी प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन केले. पान २ वर

### चिमुकल्यांनी लुटला पोहण्याचा आनंद




● उन्हाळ्याच्या दिवसात कोरडी असलेली महाजने गावातील नदी मान्सूनच्या पावसात ओसंडून वाहू लागली आहे. या नदीत पोहण्याचा मनमुराद आनंद लुटणारी बच्चेकंपनी. (छायाचित्र : प्रमोद जाधव)

# चिपळूणच्या रस्त्यावर आली महाकाय मगर

**| चिपळूण | वृत्तसंस्था |**

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण शहरातल्या मगरींच्या मुक्त वावराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. कारण चिपळूण शहरातल्या चिंचनाका परिसरात महाकाय मगर नागरी वस्तीत दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे. रविवारी रात्री महाकाय मगर रस्त्यावर दिसून आल्याने प्रत्यक्षदर्शींचा थरकाप उडाला. परिणामी, प्रशासनाने मगरीला नदीपात्रात सोडावं तसंच त्या बाहेर येऊ नये, यासाठी कार्यवाही करावी ही मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.



चिपळूण शहरातून वाहणाऱ्या शिव नदीत मगरींचा प्रचंड वावर आहे. चिपळूणमधल्या चिंचनाका भागात मगर रस्त्यावर आढळून आली. शिव नदीच्या पात्रातील मगरीं पावसाळ्यात मानवी वस्तींमध्ये वावरताना दिसून येतात. रविवारी रात्री अशीच एक भली मोठी मगर रस्त्यावर दिसून आली. ही मगर पाहून रस्त्यावरून जाणाऱ्या वाहन चालकांची देखील पान २ वर

## ग्रामस्थांचा स्थलांतरासाठी आटापिटा
# पोलादपूर-माटवण आदिवासीवाडीवर | दरडीचे सावट

**शैलेश पालकर**
**| पोलादपूर |**

तालुक्यातील २००५च्या कोतवाल कोंढवी पाठोपाठ २०२१च्या केवनाळे व साखर सुतारवाडीतील दरड बळीनंतर प्रशासनाला पुनर्वसन व स्थलांतरण करण्यासाठी जाग आली होती. दरडबळी होण्याची परिस्थिती उद्‌भवण्यापूर्वीच माटवण आदिवासीवाडी ग्रामस्थांचे स्थलांतरण होण्यासाठी गेल्यावर्षीपासून आटापिटा सुरू झाला आहे. मात्र, स्थलांतरण करण्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असून ग्रामस्थांच्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



पोलादपूर तालुक्यातील दरडप्रवण तसेच संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या गावांच्या संख्येमध्ये वाढ करण्याची आवश्यकता असूनही प्रशासनाकडून रायगड जिल्हा नैसर्गिक आपत्ती निवारण यंत्रणेला विविध गावांची सद्यस्थिती समजावून सांगितली जात नसल्याचे दिसून येत आहे. पोलादपूर तालुक्यातील माटवण महसुली गावातील आदिवासीवाडीमध्ये लगतच्या डोंगरामधून दरडी कोसळण्याचा धोका असून काही ठिकाणी दरड कोसळण्यास सुरूवात झाल्याचे स्पष्ट दिसू लागले आहे. या डोंगराच्या विरूध्द दिशेला एक डबर दगडखाण असून तिथे मागणीनुसार गौण खनिज उत्पादन करण्यासाठी वेळप्रसंगी सुरूंगस्फोटदेखील केले जात असल्याने हा लाल मातीचा डोंगर खिळखिळा झाला आहे. दगडांनी लोकवस्तीपर्यंतचा टप्पा गेल्यावर्षीच पार केला असल्याने पान २ वर

**दि. ४ सप्टेंबर २०२३ रोजीच्या ग्रामसभेमध्ये या आदिवासीवाडीचे कायमस्वरूपी स्थलांतरण होण्यासाठी ग्रामपंचायत माटवणकडून ठराव करण्यात आला होता. यावेळी सर्वे नंबर १२४ या गुरचरण जमिनीचा कायमस्वरूपी स्थलांतरणासाठी उपयोग करण्यास ग्रामपंचायतीची कोणतीही हरकत नसल्याचेही या ठरावात नमूद करण्यात आले आहे.**

# किल्ले रायगडावरील वाटेवर कोसळली दरड

**| महाड | वार्ताहर |**

रायगड किल्ल्यावर जाणाऱ्या पायवाटेवर दरड कोसळल्याने गडाचा पायरी मार्ग धोकादायक झाला आहे. दरडीमध्ये स्थानिक व्यावसायिकाच्या छोट्या दुकानाचे नुकसान झाले. या ठिकाणी पडलेले काही मोठे दगड स्थानिकांनी बाजूला केल्याने पायरी मार्ग सध्या सुरू आहे. दरम्यान सातत्याने घडणाऱ्या दरडींच्या घटनांमुळे गतवर्षी पायरी मार्ग बंद करण्यात आला होता. रायगड किल्ल्यावर जाण्यासाठी एक हजार चारशे पायऱ्या असून काही ठिकाणी सपाट पायवाट आहे. गडावर जाण्यासाठी पायरी मार्गाचा पहिला टापू चढून गेल्यानंतर लागणाऱ्या सपाट पायवाटेवर दरड कोसळली. वाटेवर लहान मोठे अनेक दगड कोसळले असून एका टपरीचे नुकसान झाले आहे. रायगडावर वर्षभर शिवप्रेमी व पर्यटक येत असून दरड कोसळली त्या वेळी कोणीही पर्यटक नसल्याने मोठा अनर्थ टळला.



रायगड किल्ल्यावर पायरी मार्गावर गतवर्षी दरड पान २ वर

# रानभाज्या महोत्सवाला मोठा प्रतिसाद

**। नेरळ । वार्ताहर ।**

**कर्जत कृषी विभागाचे वतीने कृषी दिनाचे आयोजन करण्यात आले होते.या कृषी दिनानिमित्त रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात मोठ्या प्रमाणावर सहभागी घेतला होता.**



कर्जत तालुका कृषी विभाग यांच्या माध्यमातून कृषी दिनाचे आयोजन कशेळे येथील हनुमान मंदिर येथे करण्यात आले होते या कृषी दिनाचे कार्यक्रमात रानभाज्या महोत्सव, शेतकऱ्यांना शेतीपिकाचे माहिती देण्यासाठी कोकण कृषी विद्यापीठ कर्जत भात संसोधन केंद्र येथे करण्यात आले होते.

शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेत एक रुपयात पीक विमा काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन उपविभागीय कृषी अधिकारी नितीन फुलसुंदर, तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी, सचिन केंने, मंडळ कृषी अधिकारी मंगेश गलांडे, किरण गंगावणे, शशिकांत गोसावी तसेच पर्यवेक्षिका आणि कृषी सहायक यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कर्जत तालुक्यातील प्रगत शेतकरी काळूराम निरगुडे यांना पेरू लागवड बद्दल,अनिल जोशी यांना बटाटा लागवडीबद्दल तसेच सुरेखा मते यांना मसाला कांडप यंत्रणा उभारण्यासाठी तर पांढरा कांदा उत्पादनासाठी अंकुश शेळके तसेच लाल भेंडी पिकविणारे नवनाथ शेळके तर रक्तचंदन शेतीबद्दल अर्जुन झुगरे आणि कृषी विभागाच्या योजना यांचा प्रसार प्रचारासाठी पत्रकार संतोष पेरणे या सर्वांचा सन्मान करण्यात आला.

### या भाज्या ठरल्या आकर्षण

**कृषी दिनाचे निमित्ताने रानभाज्या महोत्सवाचे आयोजन केले होते.या महोत्सवात कर्जत तालुक्यातील असंख्य शेतकरी यांनी सहभाग घेतला होता. त्यात सुनील विषे- फराटपाडा, नवनाथ शेळके- आरडे, जयवंत मते, सुनीता कोळंबे, ज्ञानेश्वर जामघरे, महेश साळवी, सुषमा पाटील, वैजयंती पादीर, स्नेहा मते, सुरेखा मते, नीलम मते, दीपा मते, मीना मते, वाळकु बदे, अनंता भोर्डे, जनार्दन माळी, नरेश भुंडेरे आदी शेतकऱ्यांनी घेतला.**

**या रानभाज्या महोत्सवात भारंगी, शेवगा, आलू, ओला बिर्डा, कुरडू, टाकला, लोत, घोळ, सराटा, भापले, कोळू, माठ, चायवळ, करटोली आदी भाज्या तर त्या सुकलेल्या भाज्या यांच्यापासून बनवलेली वळकांदाचे कांद, कुड्याच्या शेंगा, शेवळाची भाजी, तेलपटाची भाजी, मोडुदेची भाजी, सुकलेली लोत,भारंगीची भाजी, नळीची भाजी, सुरणाचे काप, अळू वडी यांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.**

**या रानभाज्या महोत्सवात सुषमा पाटील यांच्या शेवळ्याचे सूप या उत्पादनास प्रथम क्रमांक तर नेहा मते यांचे वळकांदाचे काप या पदार्थात दुसरा तसेच तिसरा क्रमांक सुरेखा मते यांच्या कड्याच्या शेंगांची भाजी आणि चौथा क्रमांक वनिता जामघरे यांच्या मोदुड्याची भाजी यास क्रमांक देण्यात आल. अधिकारी वर्गात अनुराधा अंधारे, कल्याणी कोरपड यांना उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आले.**

# तरुणांना स्वयंरोजगार प्रशिक्षण

## ■ प्रशिक्षणार्थी यांचे जिल्हाधिकारी यांच्याकडून कौतुक

**। नेरळ । वार्ताहर ।**

बँक ऑफ इंडिया कडून स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.या प्रशिक्षण शिबिराचे निमित्ताने रायगड जिल्ह्यातील सुशिक्षित तरुणांना स्वयंरोजगाराचे मार्गदर्शन करण्यात आले.या शिबिरात यशस्वी सहभाग घेतलेल्या तरुणांना प्रमाणपत्र वाटप आणि वार्षिक क्रियाकल्प अहवाल रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

रायगड जिल्ह्यामध्ये बँक ऑफ इंडिया संचालित स्टार रोजगार प्रशिक्षण संस्था ही सुशिक्षित युवक युवती तसेच महिलांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्याचे काम करत आहे. यामध्ये प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगार उपलब्ध करण्याचे मार्गदर्शन केले जाते.

यात कुक्कुटपालन,शेळीपालन, कुत्रिम दागिने बनविणे, अगरबत्ती बनविणे, ज्यूट पासून विविध वस्तू बनविणे,पेपर बॅग्स आणि कापडी बॅग्स बनविणे, पापड आणि लोणची बनविणे, टेलरिंग, ब्युटी पार्लर, मस्त्यपालन, घरगुती उपकरण दुरुस्ती, फोटोग्राफी, फास्ट फूड अशा विविध प्रकारचे व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. स्टार रोजगार प्रशिक्षण संस्थेचा २०२३-२४ चा वार्षिक अहवाल रायगड जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आला.

यावेळी बँक ऑफ इंडिया रायगड विभागाचे प्रमुख मुकेश कुमार, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी, नाबार्डचे जिल्हा विभाग व्यवस्थापक प्रदीप अपसुंडे, रायगड जिल्हा औद्योगिक केंद्राचे जनरल मॅनेजर जी. एस. हरळय्या, संस्थेचे संचालक सुमीकुमार धानोरकर तसेच संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे संचालक सुमितकुमार धानोरकर यांनी संस्थेमार्फत मिळणाऱ्या व्यवसायाभिमुख प्रशिक्षणाबद्दल माहिती दिली. महिलांनी फक्त गृहिणी न राहता स्वरोजगार कडे वळावे त्यासाठी बँक ऑफ इंडिया आणि आरसेटी पूर्णपणे सज्ज आहे.

व्यवसायाभिमुख प्रशिक्षणाचा लाभ घेऊन महिलांनी आत्मनिर्भर व्हावे तसेच लहान लहान कामातून मोठी सुरुवात करता येईल आणि त्यातून महिला उद्योजिका निर्माण होतील हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महिलांनी उत्तम प्रशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे व महिलांचे आर्थिक सक्षमीकरण का गरजेचे आहे हे सांगितले.

# हिंदू लोहार समाज महासंघाची सभा संपन्न

**। पनवेल । वार्ताहर ।**

हिंदू लोहार समाज महासंघ, मुंबई, महाराष्ट्र यांची उपक्रमांची नियोजन सभा संपन्न झाली.

हिंदू लोहार समाज महासंघ, मुंबई, महाराष्ट्र यांचे कार्यकारी मंडळ, तसेच ठाणे, रायगड, पालघर जिल्हा व तालुका कार्यकारी मंडळीतूल पदाधिकारी उपस्थित होते. महासचिव बळीराम खरे यांनी विषय पत्रिकेतील काही ठळक मुद्दे मांडून त्यांची सविस्तर माहिती दिली. वधूवर मेळावा, रोजगार मेळावा, ज्येष्ठ नागरिक स्नेहसंमेलन, महिला मंडळ सांस्कृतिक कार्यक्रम, श्री विश्वकर्मा जयंती, गणेशोत्सव सजावट स्पर्धा, उत्कृष्ट कारागीर आणि कलाकार पुरस्कार, विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम, समाज सभासद नोंदणी अभियान राबविणे, यावर अध्यक्ष आण्णासाहेब जोशी, उपाध्यक्ष रामनाथ मोरे, कार्याध्यक्ष संतोष जोशी, दिलीप जोशी, सहसचिव नरेशसोमवंशी, सहखजिनदार सुनील खंडागळे, पालघर जिल्हा अध्यक्ष आत्माराम व्यापारी, रायगड जिल्हा अध्यक्ष अरुण जोशी, ठाणे जिल्हा अध्यक्ष यशवंत व्यापारी, महिला आघाडी प्रमुख मीना कदम तसेच तालुका पदाधिकाऱ्यांनी आपले मत मांडले.

तसेच हिंदू लोहार समाज महासंघ यांच्या विद्यमाने मुख्यमंत्री हरित महाराष्ट्र लोहार समाज अभियान राबविण्याचे नियोजन करण्यात आले, त्याची प्रथम सुरुवात रायगड जिल्ह्यातील माथेरानच्या पायथ्याशी करण्याचे नियोजन करण्यात आले.

# ताम्हिणीतील धबधब्यांमुळे पर्यटनात वाढ

**। माणगाव । वार्ताहर ।**

तालुका निसर्गसौंदर्याने संपन्न असा तालुका आहे. विविध प्रकारच्या वनस्पती, वन्यप्राणी, नैसर्गिक धबधबे व ऐतिहासिक वास्तू यामुळे तालुक्याला पर्यटनाची संधी आहे. कोकणाला जोडणाऱ्या या तालुक्याला ताम्हिणी घाट रस्ता निर्माण झाल्याने फायदा होत आहे.



ताम्हिणी घाटातील पावसाळ्यातील धबधब्यामुळे माणगाव तालुक्याची ओळख अधिक गडद झाली आहे. या प्रवेशद्वारा बरोबरच माणगाव तालुक्यातील पर्यटकांना उपयुक्त असणाऱ्या कांही ऐतिहासिक पाऊल खुणा माणगावात पहायला मिळत आहेत. त्यामुळे माणगाव हे पर्यटकांच्या दृष्टीने महत्वाचे विकसनशील तालुका म्हणून नवी ओळख मिळत आहे. पुणे-ताम्हिणी मार्ग हा वाहतुकीसाठी तब्बल २३ वर्षापूर्वी खुला झाला. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्याला जोडणाऱ्या जिल्ह्यांसाठी कमी अंतराचे कमी वेळेत पर्यटन दर्शनाची भ्रमंती करता कोकणात मोठ्या प्रमाणात येवू लागला. दक्षिण रायगडचे आकर्षणात महत्वाची बाब म्हणजे कोकण रेल्वे या रेल्वेंनी हजारो पर्यटक दिवसाला माणगाव रेल्वे स्थानकावर उतरून पुढचा प्रवास करतात.

कोकणातील मोहक दर्शन हिरवागार डोंगर त्या डोंगरातून वाहणारी दरी व फेसाळ धबधबे शेकडो मीटर उंचीवरून नागमोडी रस्ता करीत धावतात. त्यातच भुरळ पडते ती रस्ते व नागमोडी वळणावरील कड्या कपारींची. उंच कड्यावरून रायगडची वाट काढणारा नागमोडी रस्ता आणि त्या रस्त्यावरील वळणे हे पर्यटकांचे वाढते आकर्षण आहे. त्यातच नजर जाते ती डोंगरापार दडलेल्या छोट्या कौलारू गाव कुसांची. त्या गाव कुसा बाहेरील छोटी हिरवीगार भात शेती आणि त्या शेतातून वाट काढीत छोट्या-छोट्या नद्यांना मिळणारे पाणी हे दृश्य पाहून पर्यटक आपले दुःख काही काळासाठी विसरून जातात. ऐतिहासिक स्थळे तसेच निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी पर्यटक आवर्जून येतातच त्याच बरोबरीने कोकणात जाताना मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे माणगावचे महत्व अधोरेखित होते. त्यामूळे ताम्हिणी घाट मार्ग माणगाव तालुक्यातील पर्यटनासाठी महत्वाचा ठरत आहे.

> **माणगाव तालुका निसर्गसंपन्न व धबधबे तसेच ऐतिहासिक दृष्टया महत्वाचा आहे. ताम्हिणी मार्गामुळे पुणे व इतर शहरे जोडली गेली आहेत त्यामुळे पर्यटन वाढ होत असून पर्यटकांची संख्या वाढत आहे.याचा निश्चितच फायदा तालुक्यातील शेतकरी व व्यापारी तसेच व्यावसायिक यांना होत आहे.**
> **- काशिनाथ गाणेकर, माणगाव.**

# ‘इंटक संघटना कर्मचाऱ्यांच्या पाठीशी’




**। पनवेल । वार्ताहर ।**

जगातील सर्वात जास्त सभासद संख्या असलेली इंटक संघटना सदैव देशभरातील संघटीत व असंघटीत कर्मचारी यांच्या पाठीशी ठाम उभी राहील, असे प्रतिपादन कामगार नेते महेंद्र घरत यांनी केले. राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) ही संघटना देशात एक नंबरची राष्ट्रीय संघटना असून कामगारांचे हक्क अबाधित राखण्यासाठी सर्वतोपरी काम करणारी एकमेव संघटना असल्याचेही त्यांनी सांगितले.

नॅशनल युनियन ऑफ पोस्टल एम्प्लॉइज यांचे द्विवार्षीक अधिवेशन व अजय विठोबा जाधव यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे नवीन पनवेल येथे आयोजन करण्यात आले होते. या अधिवेशनाचे उद्घाटन महेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले. सॉर्टींग पोस्टमन अजय जाधव हे आपल्या ४४ वर्षाच्या सेवेनंतर दिनांक ३० जून २०२४ रोजी सेवा निवृत्ती झाले सेवापूर्ती निमित्त मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

पान १ वरून

## ‘मिशन’ जलजीवन

ठिकाणी जुन्याच योजनेतील पाईपलाईनचा वापर करून नवीन योजना राबविल्या जात असल्याची बाब आ. जयंत पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. जलजीवन मिशनअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचा दर्जा निकृष्ट असून संबंधितांविरोधात तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याची राबविल्या जात असल्याची बाब आ. जयंत पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. जलजीवन मिशनअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचा दर्जा निकृष्ट असून संबंधितांविरोधात तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याचेही त्यांनी सांगितले. आ. जयंत पाटील यांनी प्रश्नांचा भडीमार करून पाण्याच्या प्रश्नाबाबत सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी पाणी पुरवठा मंत्री गुलाबराब पाटील यांनी दुजोरा देत ३१७ योजना भौतिक व आर्थिकदृष्ट्या पुर्ण झाल्या आहेत. त्या देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामपंचायतीकडे वर्ग केल्या आहेत. ८६७ योजनांची कामे प्रगतीपथावर असून १६ योजनांची कामे सुरु करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामांवर जागेच्या व वनविभागाकडून अडचणी येत आहेत. याबाबत जिल्हा स्तरावर वारंवार बैठका घेऊन अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच जलजीवन अंतर्गत येणाऱ्या तक्रारीवर जिल्हा स्तरावर बैठक घेऊन तक्रारीचे निरसन करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. यापूर्वीदेखील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. जयंत पाटील यांनी जलजीवन मिशनच्या कामांबाबत नाराजी व्यक्त केली. यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी दुजोरा देत योग्य पध्दतीने कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना केली. त्यावेळी प्रशासन खडबडून जागे झाले. त्यांनी तालुका, जिल्हास्तरावर बैठका घेऊन जलजीवन मिशनचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. मात्र जिल्ह्यातील काही ठेकेदार आजही मनमानी कारभार करीत आहेत. योजना पूर्ण होऊनदेखील पाणी नाही, रस्त्याच्या कडेला पडलेले पाईप अशी अवस्था असल्याचे दिसून येत आहे.

## विनयभंग करणाऱ्यांस तीन वर्षांची शिक्षा

वाद ऐकल्यानंतर न्यायालयाने शासकीय अभियोक्ता यांचा युक्तिवाद ग्राह्य धरला आणि आरोपीला दोषी ठरवत शिक्षा सुनावली. सदरचा गुन्हा हा १९ एप्रिल २०२३ रोजी अलिबाग शहरातील रामनाथ परिसरात घडला होता. आरोपीने पीडित अल्पवयीन मुलीला तिच्या घराच्या अंगणातून फुस लावून पळवून नेले. त्यानंतर तिला आपल्या घराच्या समोरील निर्जन पत्र्याच्या शेडमध्ये नेऊन अश्लील चाळे केले. विनयभंग करून जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. पीडित अल्पवयीन मुलीने याबाबत घरच्यांना सांगितल्यानंतर मुलीच्या वडिलांनी आरोपी विरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

## दीक्षाभूमीतील भूमिगत पार्किंगचा मुद्दा तापला

नागपूर येथील कुठलीही पार्किंगची मागणी नसतांना ट्रस्टींनी त्याचा घाट घातला. याविरोधात जनता उतरली आहे. ट्रस्टीनी लोकांच्या भावनेशी खेळू नये. आमचाही या पार्किंगला विरोध आहे. आंदोलनकारी जनतेच्या पाठीशी वंचित बहुजन आघाडी उभी आहे. याशिवाय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. दीक्षाभूमी हा जनतेच्या आस्थेचा विषय आहे. त्यामुळे जनतेच्या भावनेचा आदर करून दीक्षाभूमीचा विकास व्हावा, अशी काँग्रेसची भूमिका आहे, असे ते म्हणाले.

## चिपळूणच्या रस्त्यावर आली महाकाय मगर

चांगलीच बोबडी वळली. प्रत्यक्षदर्शींनी मगरीचा रस्त्यावरील व्हिडीओ फोनमध्ये चित्रित केला. त्यानंतर सोशल मीडियावर तो व्हिडीओ व्हायरल झाला आहे. मगरीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होतो आहे. मानवी वस्तीमध्ये मगरींचा मुक्त वावर हा आता चिंतेचा विषय बनू लागला आहे. चिपळूणमधून वाहणाऱ्या वशिष्ठी आणि शिव नदीपात्रातून अनेकदा मगरी शहरात येत असतात. यापूर्वी देखील मगरी शहरी भागात आल्याच्या घटना घडलेल्या आहेत. मानवी वस्तीत मगर आढळून आल्याने खळबळ उडाली. काही प्रत्यक्षदर्शींनी मगरीचा व्हिडीओ फोनमध्ये कैद केले आहेत. यापूर्वी गोवळकोट भागात मगर आढळून आली होती. आता चिंचनाका भागात मगर आढळून आली आहे. चिंचनाका भागातील मगर मुख्य रस्त्यावर पोहोचली होती. एक रिक्षाचालक आणि कारमधील काही जणांनी मगरीचा व्हिडीओ चित्रित केला. यानंतर या मगरीचा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आला.

## किल्ले रायगडावरील वाटेवर कोसळली दरड

कोसळल्याने सोलापूर येथील एका पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर काही दिवसांतच पुन्हा चित्त दरवाजाजवळ दरड कोसळल्याने रायगडावरील मुख्य मार्गावर असणाऱ्या टपऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. ही घटना लक्षात घेता, प्रशासनाने तत्काळ रायगड किल्ल्याचा पायरी मार्ग १५ जून ते ३१ ऑगस्ट या कालावधीमध्ये बंद केला होता. यावर्षी देखील गडाचा मार्ग पावसाळ्यात धोकादायक झाल्याने शिवप्रेमी व पर्यटकांबरोबरच स्थानिक व्यावसायिकांची सुरक्षाही धोक्यात आली आहे.

## दि.बा. पाटील यांचे नाव द्या

विमानतळ प्रकल्पबाधितांच्या विविध प्रश्नांवर गेली ४ ते ५ वर्षे सातत्याने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कमिटी संलग्न अखिल भारतीय किसान सभेच्या माध्यमातून विविध आंदोलनाच्या माध्यमांतून प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. अनेक बैठका झाल्या परंतू सिडको महामंडळाने आमच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या प्रलंबित असून वाघीवली गावातील प्रकल्पग्रस्तांना तातडीने घरांच्या भूखंडाचा ताबा द्यावा, वाघीवली गावातील ज्या लोकांनी घरे तोडलेली आहेत त्यांना आतापर्यंत तसेच पुढील प्लॉटचा ताबा देऊन ओ.सी. मिळेपर्यंत मार्केटप्रमाणे घरभाडे भत्ता चालू ठेवावा, प्रकल्पबाधित मच्छिमारांना पुनर्वसनासाठी नुकसान भरपाई द्यावी, १० गावातील बेरोजगार युवक व युवतींना विमानतळातील नोकऱ्या उपलब्ध होण्यासाठी रोजगारक्षम प्रशिक्षण द्यावे, चिंचपाडा तलावपाली येथील घर मालकांना त्यांना तिप्पट भुखंड व आर्थिक सहाय्य पुर्ण पॅकेज मिळाले पाहिजे, ज्यांची घरे सिडकोने तोडली आहेत त्यांना बांधकाम खर्च रु. १५००/- प्रमाणे देण्यात यावा, प्रलंबित असलेल्या सी.सी. व ओ.सी. तातडीने देण्यात याव्या, पुर्नवसीत आर. आर. (उलवे व करंजाडे) क्षेत्रात नागरी सुविधा पुरवाव्यात अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. विमानतळ प्रकल्पबाधित भूमिपुत्रांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्याबदल्यात योग्य मोबदला देण्याच्या वल्गना सिडको प्रशासनाने दिल्या. मात्र सिडकोने प्रकल्पग्रस्तांची सपशेल फसवणूक केली आहे. विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील साहेबांचे नाव देण्यात यावे ही प्रकल्पग्रस्तांची प्रमुख मागणी आहे. यासह प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न अद्यापही प्रलंबित आहेत. त्यामुळे भर पावसात प्रकल्पग्रस्तांना रस्त्यावर उतरून मोठा संघर्ष करण्याची वेळ आली आहे. या लढ्यात काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीनीशी उतरेल आणि आमचा हक्क मिळवल्याशिवाय गप्प बसणार नाही, अशी ठाम भूमिका पनवेल तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांनी व्यक्त केली. तर सिडकोने प्रकल्पग्रस्तांना ज्या पॅकेजचे आश्वासन दिले त्याबाबत अद्यापही पूर्तता केलेली नाही. सिडकोने प्रकल्पग्रस्तांच्या घरावर तोडक कारवाई करूनही योग्य मोबदला दिलेला नाही. प्रकल्पग्रस्तांना दाखला देऊन विमानतळात नोकऱ्या मिळणे आवश्यक आहे. विमानतळाच्या कंपाउंड वॉलवर विमानतळ उभारणाऱ्या कंपनीचे व सिडकोचे टाकले आहे. त्यामुळे विमानतळाला दीबांचे नाव दिल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, अशी भूमिका अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे यांनी व्यक्त केली. याप्रसंगी पनवेल तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, किरण केणी, वाघिवली सरपंच अनिल पाटील, संजय ठाकूर, ॲड.प्रशांत भोईर, विशाल भोईर, विजय भगत, सुधाकर कोळी, श्रीधर पाटील, सतीश कोळी, अंकुश भगत, वाघिवली, चिंचपाडा ग्रामस्थ व विमानतळबाधित १० गावातील प्रकल्पग्रस्त, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दरडीचे सावट

या आदिवासीवाडीवर दरडीची टांगती तलवार असल्याचे उघड झाले होते. पोलादपूर तहसिल कार्यालयाला पाठविण्यात आलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने मंडल अधिकारी राठोड यांनी दरडग्रस्त लोकवस्तीची प्रत्यक्ष पाहणी करून गुरचरण जागेचा अहवाल आदिवासीवाडी ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यासाठी भेटही दिली. यावेळी निवेदनावर स्वाक्षरी व अंगठयाचा ठसा उमटविणारे रोहित वाघे, आकाश मुकणे, बाळा वाघे, वसंत मुकणे, सुरेश मुकणे, भरत पवार, संतोष मुकणे, अना वाघे, दशरथ वाघे, कळी वाघे, नंदा जाधव, इटा मुकणे, निर्मला मुकणे, काया वाघे, सरू वाघे, रंजना पवार, वसंत मुकणे, गौरी मुकणे, कोमल मुकणे, बारकू मुकणे, सिताराम मुकणे व रूमा मुकणे यांनी मंडल अधिकारी राठोड यांच्या भेटीवेळी विस्थापित होण्याची मानसिकता स्पष्ट केली. यावेळी गुरचरण जमिनीवर सुमारे ४० आदिवासी कुटूंबांचे कायमस्वरूपी स्थलांतरण करण्यासाठी अनुकूलता असल्याने शासनाने याकामी तातडीने सहकार्य करण्याचे आवाहन निवेदनाद्वारे आदिवासी ग्रामस्थांनी केले आहे. गेल्या काही दिवसांपासून या डोंगरातून मातीचा ढिगारा भुस्खलन होऊन कोसळला असून काही दगडांनी आदिवासी वाडीतील घरांच्या दिशेने वाटचाल केल्याने या वस्तीवरील भुस्खलनाचा धोका दिसून आला आहे. मात्र, पोलादपूर तहसिल कार्यालयाकडून मंडल अधिकारी यांच्यामार्फत मिळालेल्या अहवालाबाबत शासनाकडे पाठपुरावा झाला आहे अथवा कसे, याबाबत ग्रामस्थांना काहीही समजून आले नसल्याने आता जोपर्यंत दरडीखाली गाडले जाणार नाही तोपर्यंत सरकार आम्हा आदिवासीवाडीतील ग्रामस्थांना स्थलांतरीत करणार नाही, अशी नैराश्यपूर्ण प्रतिक्रिया माटवण आदिवासीवाडी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. माटवण आदिवासीवाडीतील ग्रामस्थांनीदेखील सरपंच माटवण ग्रामपंचायत यांच्याकडे कायमस्वरूपी स्थलांतरण होण्यासाठी निवेदन दिले असून या निवेदनावर २१ कुटूंबांचे अंगठे व स्वाक्षऱ्या आहेत.

## २१ लाखांचा मुद्देमाल जप्त

पडून जखमी झाली. काही दक्ष नागरिकांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला. त्यामुळे संदीप महिपाल पाल याच्याविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या एका प्रकरणात २९ जून रोजी नागोठणे जवळील मिरानगर भागात आरोपी अक्रम अब्दुलगणी सय्यद (वय ४२, रा. रमणमामा नगर बैंगनवाडी, गोवंडी-मुंबई) हा आपल्या ताब्यातील आयशर टेम्पोमध्ये १४ म्हैशी दाटीवाटीने भरून वाहतूक करीत असताना नगोठणे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. याबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या दोन्ही घटनांचा तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार महेश लांगी हे करीत आहेत. या दोन घटनांमध्ये सुमारे १९ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# वन विभागाकडून अमृत वृक्ष आपल्या दारी

## ■ संकल्पनेवर आधारित झाडांचे विक्री केंद्र



**। नेरळ । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य सरकारकडून आजपासून वन महोत्सव साजरा करण्यास झाली आहे. कर्जत वन विभाग यांच्याकडून वन महोत्सव साजरा होत असून शेतकरी, तरुण वर्ग यांनी मोठ्या प्रमाणात कर्जत येथे वृक्ष लागवड करावी यासाठी स्वस्त दरात रोपे विक्री केंद्र सुरु केले आहे. वन विभागाच्या अमृत वृक्ष आपल्या दारी हि संकल्पना कर्जत मध्ये वन विभागाकडून राबविली जात आहे.

आज कृषी दिनापासून वन विभाग आपला वन महात्सव साजरा करीत आहे. यावर्षी एक जुलै ते आठ जुलै या कालावधीत वन महोत्सव साजरा होणार आहे. या कालावधीत समाजातील सर्व वर्गातोही लोकांनी अधिक प्रमाणात झाडे लावली पाहिजेत यासाठी वन विभागाकडून अमृत वन आपल्या दारी हि संकल्पना समोर आणली आहे. १ जुलै पासून सुरू होणाऱ्या वन महोत्सव कार्यक्रमानिमित्त वनविभाग अलिबाग अंतर्गत वनपरिक्षेत्र कर्जत पूर्व, पश्चिम व सामाजिक वनीकरण कर्जत यांचे माध्यामातून, शासनाच्या उपक्रमांतर्गत अमृत वृक्ष आपल्या दारी या संकल्पनेवर आधारीत स्वस्त दरात रोपे विक्री केंद्र सुरु करण्यात आले. या केंद्राचे उद्घाटन लाडीवली येथील प्रगतशील शेतकरी नरेश तुपे यांच्या हस्ते कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात करण्यात आले.यावेळी कर्जत वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण, समीर खेडेकर, मिलिंद राऊत व वनविभाग कर्मचारी तसेच कृषी दिनाचे औचित्य साधून तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड आदी उपस्थित होते.

स्वस्त रोपे विक्री केंद्राच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत सदर रोपे पोहोचून कर्जत व आजूबाजूचा परिसर हरित होण्यास मदत मिळणार आहे. तसेच केंद्र शासनाच्या एक पेड माँ के नाम या संकल्पनेची अंमलबजावणी करणे सुलभ होणार आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व. श्री. दिनेश कुमार जवारा राम सेन व श्री. वसना लासु राम, राहणार - सदनिका क्र. २१०१, भूखंड क्र. २९४५, राऊत बिल्डींग, कारपेंटर दुसरी स्ट्रीट, गिरगाव, मुंबई - ४०० ००४ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. गजोरा इडिफिस प्रायव्हेट लिमिटेड तर्फे डायरेक्टर १. श्री. गोविंद करमन गजोरा २. दिपेश गोविंद गजोरा ३. पार्थ गोविंद गजोरा** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३५११ | २६.०६.२०२४ | पुष्पक नोड | २७ | ४० | १८४० | १३.०९.२०२३ | १८.०९.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०४६/२०२४-२५

**निवडक**

## घरफोडी प्रकरणी अटक

**पनवेल :** पनवेल शहरातील एका चर्चमध्ये त्रिकुटाने चोरी करून दानपेटीमधील रोख रक्कम चोरुन नेली होती. त्याचप्रमाणे येथील साईकुंज बंगल्यामध्ये सुद्धा या त्रिकुटाने घरफोडी करून रोख रक्कम व दागिने असा मिळून जवळपास ५२ लाखांचा ऐवज चोरुन नेला होता. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट १ चे पथक या आरोपींचा कसून शोध घेत असताना त्यांनी अग्र धनबहादुर बिस्ट (३८), धनबीरे राहुले विसुक्रमा (३१) व नवीन रतन विश्वकर्मा (३६) या त्रिकुटाला ताब्यात घेतले आहे.

## बांगड्यांची चोरी

**पनवेल :** एक ६७ वर्षीय वृद्ध महिला बसमध्ये चढत असताना तिच्याकडील दोन तोळ्यांच्या सोन्याच्या बांगड्यांची चोरी केल्याची घटना पनवेल एसटी बस डेपोमध्ये घडली आहे. रजनी पाटील या पनवेल एस.टी.डेपो येथे बसमध्ये चढत असताना एका अज्ञात इसमाने त्यांच्या हातातील दिड लाख रुपये किंमीच्या दोन तोळ्याच्या सोन्याच्या बांगड्या चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अल्पवयीन तरुणीचे अपहरण

**पनवेल:** वनिता कातकरी (१७) या अल्पवयीन तरुणीला कुणीतरी अज्ञात इसमाने भुरळ घालून कायदेशीर रखवालीतून पळवून नेल्याची घटना घडली आहे. वनिताची उंची ४ फुट ५ इंच, बांधा मध्यम, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे मध्यम असून अंगात पांढऱ्या रंगाची पॅन्ट व काळ्या रंगाची टी-शर्ट तसेच पायात चॉकलेटी रंगाची चप्पल घातलेली आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे २७४५२३३३ किंवा सपोनि राजरत्न खैरणार यांच्याशी संपर्क साधावा.

## अज्ञात इसमाचा मृतदेह

**पनवेल :** पनवेल परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या इसमाचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्षे, रंग सावळा, अंगाने सडपातळ, केस मोठे व काळे तसेच दाढी-मिशी वाढलेली असून, अंगात निळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा.

## तरुण बेपत्ता

**पनवेल :** पळस्पे फाटा येथील फहाद मस्तानअली शेख (१४) हा राहत्या घरातून काही न सांगता कुठेतरी निघून गेल्याने तो बेपत्ता असल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. फहाद रंगाने सावळा, उंची ५ फुट ५ इंच, अंगाने मध्यम बांधा, चेहरा उभट, केस काळे, कपाळावर डाव्या बाजूस जखमेचे व्रण असून अंगात हिरव्या रंगाचा टी-शर्ट व राखाडी रंगाची पॅन्ट आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस ठाणे २७४५२३३३ किंवा सपोनि राजरत्न खैरणार यांच्याशी संपर्क साधावा.

# संचिकेसाठी महिला सात वर्षांपासून प्रतिक्षेत

**सिडको प्रशासनाच्या कारभाराबाबत नाराजी**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**गावठाण विस्तारासाठी संपादीत केलेल्या भुखंडाची संचिका मिळावी यासाठी गेल्या सात वर्षांपासून एक महिला चपला झिजवत आहे. मात्र, सिडको प्रशासनाकडून अद्यापही ती संचिका देण्यात आली नाही, असा आरोप एका महिलेने केला आहे. एका बाजूला महिलांचा सन्मान करण्यासाठी सरकार वेगवेगळ्या योजनांचा वर्षाव करीत आहे. तर, दुसऱ्या बाजूला प्रशासनाकडून संचिकेसाठी महिलेला वाट पहावी लागत आहे, ही चिंतेची बाब असल्याचे समोर आले आहे.**




उरण तालुक्यातील चिरनेर येथील कमल अरुण मुंबईकर यांचे वडील बाळकृष्ण भोईर यांची सिडकोने गावठाण विस्तारासाठी जमीन संपादीत केली होती. त्याची फाईल तयार करून संचिका के. ६६ सिडकोला देण्यात आली होती. ती संचिका वारस म्हणून मिळावी यासाठी कमल मुंबईकर यांनी सिडकोकडे मागणी केली होती. त्यांनी माहितीच्या अधिकारात माहिती घेतली. त्यावेळी भुखंडाची संचिका गहाळ झाल्याचे माहितीच्या अधिकारात सिद्ध झाले. याबाबत राज्याचे माहिती आयुक्तांकडे अर्ज करण्यात आले. त्यांनी तातडीने दखल घेत संचिकेतील कागदपत्रे शोधून द्या अन्यथा संचिका गहाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करू. तसेच, अहवाल १५ दिवसांत सादर करण्याचे माहिती आयोगाने आदेश दिले होते. संचिका मिळावी यासाठी गेली अनेक वर्षे कमल मुंबईकर सिडकोच्या कार्यालयात चपला झिजवत आहेत. परंतु, ती संचिका अजूनपर्यंत त्यांना मिळाली नाही. संचिका गहाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात माहिती अधिकारी गुन्हा देखील करण्यास दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप मुंबईकर यांनी केला आहे. याबाबत अनेक वेळा कार्यालयासमोर उपोषणासह लढा दिला आहे. परंतु, या महिलेला न्याय देण्यास सिडको प्रशासन उदासीन ठरल्याचे बोलले जात आहे.

या महिलेला न्यायासाठी सात वर्षांपासून लढा द्यावा लागत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. याकडे सरकार गांभीर्याने लक्ष देईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> **संचिकेबाबतच्या मागणीची पाहणी करून घेतली जाणार आहे. या विषयाची शहानिशा करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**
> **– प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको**



# सन्मान सावित्री संघर्षाचा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा अलिबाग तर्फे दरवर्षीप्रमाणे 'सन्मान सावित्री संघर्षाचा' हा कार्यक्रम शनिवारी (दि.२९) अलिबाग येथील सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल येथे घेण्यात आला होता. ज्या महिलांनी अकाली आलेल्या वैधव्यानंतर खचून न जाता अतिशय कष्टपूर्वक विविध अडचणींना तोंड देऊन आपल्या मुलांना वाढविले, त्यांना उत्तम शिक्षण दिले, अशा वीस सावित्रींचा प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या आणि अंनिस कार्यकर्त्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी काही महिलांनी आपले मनोगत मांडून आपला जीवन संघर्ष श्रोत्यांसमोर मांडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शुभांगी जोगळेकर या होत्या. माधवी कुलकर्णी यांनी विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसाराच्या गरजेविषयी विचार मांडले. जगभर स्त्रियांना आपल्या हक्कांसाठी झगडून विविध संकटांवर कशी मात करावी लागते याचे त्यांनी सोदाहरण स्पष्टीकरण दिले. प्रमुख पाहुण्या जिल्हा ग्रंथालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील यांनी मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे आजच्या कुटुंबसंस्थेवर होणाऱ्या विपरीत परिणामांची सोदाहरण माहिती देऊन उपस्थित श्रोत्यांना कुटुंबात उत्तम संस्कार करण्याचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमाच्या वेळी मेघना म्हात्रे यांनी प्रबोधनपर गीतांचे गायन केले. तर, स्नेहल आंब्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सुरभी संस्थेमार्फत महिला कल्याणाच्या शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. सुरेखा पाटील यांनी शेवटी आभार मानले. या कार्यक्रमाला अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे विविध कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृक्ष लागवडीतून कृषी दिन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्याचे हरित क्रांतीचे जनक, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त रायगड जिल्ह्यात सोमवारी (दि.१) कृषी दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर वृक्ष लागवड करण्यात आले. या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.




रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी कृषी दिन साजरा केला जातो. वेगवेगळे उपक्रम राबवून शेतीचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न कृषी विभागामार्फत केला जातो. यावर्षी निवडणूकीमुळे कृषी दिन साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला. अलिबागमधील कुंटेबागमधील जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आला. यावेळी नारळासह सुपारींच्या रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी मुख्य लेखा वित्त अधिकारी राहूल कदम, प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शाम कदम, माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहूल देवांग, कृषी अधिकारी मिलींद चौधरी, राजेश घरत, कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

जिल्ह्यामध्ये पंचायत समिती, ग्रामपंचायतीच्यावतीने देखील कृषी दिन साजरा करण्यात आला. यावेळी गावे, वाड्यांमधील परिसरात ठिकठिकाणी रोपांची लागवड करण्यात आली.



## अजगराला जीवदान

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

बलाप गावाजवळील एका राईसमिलमध्ये शुक्रवारी (दि.२८) एक नऊ फूट लांबीचा अजगर शिरला होता. हा अजगर येथील बंद मशीनमध्ये दडून बसला होता. तब्बल दीड तास शर्तीचे प्रयत्न करून रात्री उशिरा पालीतील सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी अजगराला पकडले व वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुखरूप सुरक्षित अधिवासात सोडून दिले. या अजगराला पकडण्यासाठी मिलमध्ये प्रवेश करत असताना गेटवरच एक चापड्या जातीचा निमविषारी साप गेटच्या कडीवर बसला होता. या सापाला देखील सावंत यांनी पकडले.



● **पनवेलच्या भिंगारी येथील गणेश कारखान्यांत संप्टेंबर मधील श्री गणेश चतुर्थी निमित्त विविध श्रींच्या मूर्ती घडवण्याचे काम जोरदार सुरु आहे. काही ठिकाणी श्रींच्या डोळयांची आखणी सुरु असून नागरिक गणेश मूर्ती पाहायला येत असून अगाऊ बुकिंग करत आहेत.**

# तरुणाचा पोलिसांकडून शोध

**। पनवेल । वार्ताहर ।**

ऑबेराय नामक तरुणाने नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत सोशल मिडीयावर मैत्री करून तिला अश्लील फोटो पाठविण्यास भाग पाडून तिचे अश्लील फोटो सोशल मीडियावरून व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीविरोधात विनयभंग, पोक्सो तसेच आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकणातील १६ वर्षीय पीडित मुलगी नवीन पनवेल भागात राहण्यास असून, ती सध्या शिक्षण घेत आहे. पीडित मुलीचे सोशल मीडियावर अकाऊंट आहे. याचाच फायदा उचलत मे महिन्यात ऑबेराय नामक तरुणाने पीडित मुलीसोबत मैत्री केली. त्यानंतर त्याने पीडित मुलीसोबत भावनिक संवाद साधून तिचे अश्लील फोटो पाठवण्यास भाग पाडले. त्यामुळे पीडित मुलीने आपले काही अश्लील फोटो ऑबेराय याला पाठवून दिले होते. त्यानंतर त्याने पीडित मुलीचे अश्लील फोटो सोशल मीडियावर व्हायरल करून तिची बदनामी केली. या प्रकारानंतर घाबरलेल्या पीडित मुलीने या प्रकाराची माहिती आपल्या पालकांना दिली. पालकांनी तत्काळ खांदेश्वर पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी ऑबेरॉय नामक तरुणाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

## सागर शिंदे बेपत्ता

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमधील सागर सदानंद शिंदे पेणमधून बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सदानंद शिंदे हे कामानिमित्त पेण येथे गेले असता ८ जून रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास बोरघर येथून ते बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांसह त्यांचे नातेवाईक त्यांचा शोध घेत आहेत. सागर शिंदे यांचे वर्णन रंगाने गोरा, उंची पाच फुट दोन इंच, केस काळे, अंगाने सडपातळ, अंगात राखाडी रंगाचा शर्ट, काळ्या रंगाची जिन्स परिधान केलेली असे आहे.

# सुनील मांजरेकर यांचा सन्मान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यात सारळ येथील डॉ. सुनील मांजरेकर यांचा सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मांजरेकर यांचा २४ जून रोजी दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार देऊन अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्री यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मांजरेकरांच्या पुरस्काराने अलिबागसह संपुर्ण रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहेत.



डॉ. सुनील मांजरेकर हे गेली २५ वर्ष दुबईत एक प्रसिद्ध उद्योजक म्हणून ओळखले जात आहेत. स्कॅन बुक कॉलिटी कसल्टनसी ही त्यांची नावाजलेली कंपनी आहे. कृषी क्षेत्राशी निगडित उद्योगातून नवीन उद्योजकांना बाजार कसा उपलब्ध करावा, तसेच उद्योग व्यवसायातील स्किल यावर त्यांची कंपनी नवीन उद्योजकांना मार्गदर्शन करीत असते. मांजरेकर हे व्यवसायानिमित्त केवळ दुबईतच नव्हे तर अन्य देशांतही जात असतात. शिवाय त्यांना सांस्कृतिक क्षेत्राची रुची असल्याने दुबईतील मराठी फोरमचे अध्यक्ष म्हणून ही कार्यरत आहेत. जी.एम.बी.एफ या संस्थेच्या माध्यमातून मराठी उद्योजकांनी सुरू केलेल्या संस्थेचे ते अध्यक्ष आहेत.

# जाहिरात फलक कोसळले

**। पनवेल । वार्ताहर ।**

घाटकोपरमध्ये जाहिरात फलक कोसळून १६ जणांचा मृत्यू घडल्याची घटना ताजी असतानाच सोमवारी (दि.१) खारघर येथील आमदूत मेट्रो स्टेशन समोर सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जाहिरात फलक कोसळण्याची घटना घडली आहे. यावेळी या ठिकाणाहून जाणाऱ्या दोन महिला थोडक्यात बचावल्याची माहिती प्रत्यक्ष दर्शिनी दिली. या दुर्घटनेत परिसरात उभ्या असलेल्या एका बैलगाडीचे आणि रस्त्यावरून जाणाऱ्या टेम्पोचे नुकसान झाले आहे.



पालिकेतर्फे नेमण्यात आलेल्या कंपनीकडून खारघर शहरात विविध भागात फलक उभारण्यात आले असून हे फलक उभारताना जाहिरातदार कंपनी नियमांचे उल्लंघन करत असल्याचे यावरून दिसून येत आहे. कारण कोसळलेल हे जाहिरात फलक अत्यंत कमी खोदाई करुन लावण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या दुर्घटनेनंतर पालिका प्रशासन जाहिरात फलक कंपनीवर कारवाई करणार का, असा सवाल राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या शहाबाज पटेल यांनी उपस्थित केला आहे.

**उपहार गृहाची दयनीय अवस्था**

# रामवाडी आगाराला अस्वच्छतेचे ग्रहण

**। पेण । प्रतिनिधी ।**

**एक काळ असा होता की, कोकणात जाणारी लालपरी रामवाडी बस स्थानकावर थांबल्याशिवाय पुढे जात नव्हती. परंतु, आज दळनवळनाची साधनं एवढ्या मोठया प्रमाणात वाढली आहेत की, त्यामुळे कित्येक जण लालपरीकडे पाठ फिरवत आहेत. त्यातच शासनाच्या नाकर्तेपणामुळे राज्यातील बस स्थानकांची दयनीय अवस्था झाली असून स्वच्छता गृहात पाऊल ठेवणेही कठीण झाले आहे. तसेच, येथील उपहार गुहाची अवस्था तर स्वच्छता गृहांपेक्षा वाईट झाली असून स्थानकातील अधिकारी वर्गही याकडे दुर्लक्ष करीत आहे.**

गेल्या वर्षी शासनाने 'हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बस स्थानक' या अभियाना अंतर्गत पुर्ण महाराष्ट्रात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षतेपणामुळे हे अभियान कागदारवरच राहिले असून बस स्थानके पहिल्यापेक्षा बिकट झाली आहेत.



कोकणात जाण्यासाठी महत्वाचे असणाऱ्या रामवाडी बस स्थानकावर सवत्र दुर्गंधी पसरलेली आहे. त्यातच सीएनजी पंपाचे काम नव्याने सुरू असल्याने अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडून पाणी साचलेले आहे. येथील स्वच्छता गृहाची अवस्था तर खुपच वाईट असून स्वच्छता गृहात पाय ठेवणे ही कठीण झाले आहे. तसेच, बस स्थानकाच्या उपहार गृहाची अवस्थाही स्वच्छता गृहापेक्षा वाईट झालेली आहे. हे उपहार गृह नसीम उस्मान खोत हे चालवत असून त्यांच्याकडे या कॅनटींगचा ठेका २०३३ पर्यंतचा आहे. त्यांना अस्वच्छते विषयी विचारणा केली असता त्यांनी मी हा ठेका सोडत असून मला परवडत नसल्याचे रडगाणे लावले होते.

यावेळी कृषीवल प्रतिनिधी उपहार गृहात गेले असता एक भयान सत्य समोर आले. तेथे एका अस्वच्छ प्लॅस्टिकच्या घमेल्यात भजीचा कांदा तर एका घमेल्यात वडयाचा चुरा, पाव असे पदार्थ निदर्शनास आले. तर, वापरण्यातील पाणी सुद्धा उघड्या बादल्यांमध्ये भरून ठेवले होते. यामुळे येथे अस्वच्छतेच्या व्याख्येच्या पलीकडची अस्वच्छता पहायला मिळाली.

या संदर्भात अधिकारी वर्गाला विचारणा केली असता तक्रारी अर्ज व फोटो देण्यास सांगितले. तक्रारी अर्ज असल्यास आम्ही कारवाई करू असे उत्तर देण्यात आले.

# कृषी दिनानिमित्त बियाणांचे वाटप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र कृषी दिन निमित्ताने कर्जत प्रेस असोसिएशनकडून कृषी विषयक कार्यक्रमाच्या माध्यमातून कृषी दिन साजरा करण्यात आला. यावेळी कर्जत तालुक्यातील तीन ग्रामपंचायतीमधील १०० शेतकऱ्यांना भाजीपाला बियाणे, तुरीच्या झाडांची रोपे तसेच परसभागेत लावण्यासाठी जंगली झाडांची रोपे आणि गांडूळ खताचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिते ग्रामपंचायत कार्यलयाच्या आवारात ५० झाडांची लागवड देखील करण्यात आली.

यावेळी कृषी विषयक कार्यक्रमाचे आयोजन जिते ग्रामपंचायतीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शशिकांत मोहिते, मारुती गायकवाड, दशरथ जाधव, पांडुरंग म्हसे, संतोष पेरणे, दीपक बोराडे, भूषण प्रधान व्यासपीठावर उपस्थित होते. सभागृहात जमलेल्या जिते कोल्हारे आणि वाकस येथील १०० हुन अधिक शेतकऱ्यांना प्रत्येकी दोन तुरीची रोपे, एक जंगली झाड, तसेच एक किलो गांडूळ खत आणि चार प्रकारचे भाजीपाला बियाण्यांची पाकिटे भेट देण्यात आली. यानंतर ग्रामपंचायत आवारात ५० जंगली झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

# नव्या कायद्याचे राज्य

सोमवार एक जुलैपासून फौजदारी कायदा नव्या स्वरुपात लागू झाला. आजवर लागू असलेला इंडियन पीनल कोड व इतर दोन कायदे पडद्याआड गेले. या कायद्याची नावेही भारतीय न्याय संहिता, नागरिक सुरक्षा संहिता, साक्ष संहिता अशी भारतीय करण्यात आली आहेत. जुन्या कायद्यात बदल आवश्यक होतेच. पण ते ज्या रीतीने झाले आहेत व त्यात ज्या तरतुदी घालण्यात आल्या आहेत त्या मात्र खास मोदींच्या हुकुम शाही राजवटीला शोभेलशा आहेत. त्यामुळेच तमीळनाडू, पश्चिम बंगाल, कर्नाटक अशा राज्यांनी ही अंमलबजावणी पुढे ढकलावी अशी मागणी केली आहे. अर्थातच मोदी सरकारने ती मान्य केलेली नाही. मारामारी, चोरी, दरोडे, खून, दंगे, बलात्कार इत्यादींबाबतचे कायदे आणि तपास तसेच सुनावणी याबाबतचे नियम लिखित स्वरुपात असू असतात ही कल्पना ब्रिटिशांनी येथे आणली. त्यामुळे अमुक गुन्ह्याला अमुक शिक्षा हे निश्चित झाले. त्यात माणसानुसार बदल होणे थांबले. आरोपीविरुध्द नीट खटला चालवणे, त्याला बचावाची संधी देणे, साक्षीपुरावे तपासले जाणे व या सर्वांच्या लेखी नोंदी ठेवणे हे ब्रिटिशांपासून सुरू झाले. लोकमान्य टिळकांना आक्षेपार्ह लिखाणाबद्दल शिक्षा झाली तशीच त्यांनीदेखील चिरोल या ब्रिटीश पत्रकाराविरुध्द लंडनमध्ये अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला. हे ब्रिटीश कायद्यामुळे शक्य झाले. आपला फौजदारी कायदा १८६० च्या नंतर आकाराला आला. त्यातील अनेक कायदे व तरतुदी आपण तेव्हापासून वापरत आहोत. विशेष म्हणजे पाकिस्तान हे मुस्लिम राष्ट्र असले तरी तेथे आणि आपल्या शेजारच्या बांगलादेशातही हेच कायदे कमी-अधिक फरकाने लागू आहेत. किंबहुना, फौजदारी कायद्याच्या संदर्भात काही वेळेला पाकिस्तानी न्यायाधीशांनी लिहिलेली पुस्तके आदर्श मानली जातात व आपल्याकडे संदर्भासाठी वापरली जातात. त्यामुळे निव्वळ ब्रिटिशांनी केला होता म्हणून ही कायद्याची चौकट सर्वस्वी वाईट होती असे नव्हे. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी प्रजेला जरबेत ठेवण्यासाठी जे नियम केले होते ते वेळोवेळी आपण बदलले होतेच.

### नव्वद दिवसांची कोठडी

कायदे व त्यांचे नाव बदलताना मोदी सरकारने अत्यंत घिसाडघाई केली. त्यांची पुरेशी चर्चा संसदेत व बाहेर होईल याची काळजी घेतलेली नाही. गेल्या वर्षी संसदेतील विरोधी पक्षांच्या सुमारे दीडशे खासदारांना निलंबित करण्यात आले होते. त्याच वेळी कोणत्याही चर्चेविना ही विधेयके संमत करण्यात आली. वास्तविक सत्तारुढ भाजपमध्येही अनेक जाणकार व वकिलीचे अभ्यास केलेले नेते आहेत. पण या विधेय़काचा तटस्थ विचार करण्याची हिंमत दाखवणे त्यांना शक्य नव्हते. यालाच अघोषित आणीबाणी म्हणतात. नवीन कायद्यामध्ये काही चांगल्या गोष्टी असल्या तरी दोन-तीन अत्यंत आक्षेपार्ह तरतुदी आहेत. पहिली न्यायालयीन कोठडीसंदर्भातील आहे. एखाद्या गुन्ह्यामध्ये आरोपी म्हणून पकडलेल्याला आजवर जास्तीत जास्त पंधरा दिवस पोलिस कोठडी मिळू शकत असे. पोलिसांनी एखाद्याला अटक केल्यानंतर लवकर तपास पूर्ण करावा आणि आरोप निश्चित करून खटला चालावा अशी अपेक्षा त्यामागे आहे. पोलिस कोठडीत दीर्घ काळ ठेवून आरोपीचा छळ केला जाण्याची शक्यता असते. शिवाय, निरपराध व्यक्तींना विनाकारण तुरुंगात टाकून त्यांचा छळ केला जाण्याची भीती दाखवणे हा प्रकार यातून रूढ होऊ शकतो. त्यामुळे दोन आठवड्यांनंतर आरोपीला साधारणपणे न्यायालयीन कोठडी दिली जाते. नव्या कायद्यात मात्र ही मुदत तब्बल ९० दिवसांपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे एखाद्याला अटक करून तीन महिन्यांपर्यंत पोलिस कोठडी मागत राहणे पोलिसांना शक्य होणार आहे. गुन्हेगार दोषी असेल तर लवकर खटला चालवून त्याच्या गुन्ह्यानुसार योग्य ती शिक्षी त्याला दिली जायला हवी. त्याऐवजी पोलिस तपास व खटले यामध्ये वेळ काढणे व त्याला तुरुंगात सडवत ठेवणे हाच मार्ग अलिकडच्या काळात अवलंबला जातो. भीमा कोरेगाव प्रकरण किंवा दिल्ली दंगल प्रकरणात डाव्या कार्यकर्त्यांना नक्षलवादी ठरवून याच रीतीने छळले जात आहे. त्यात स्टेन स्वामी यांचा तुरुंगातच मृत्यू झाला. या प्रकरणात यूएपीए किंवा अशाच भयानक कायद्यांखाली गुन्हे दाखल करण्यात आल्याने हे शक्य झाले.

### पोलिसांना मोकळे रान

पण आता अशा गंभीर गुन्ह्यांची कलमे न लावताही पोलिस व पर्यायाने सरकारला आपल्या विरोधकांचा छळ करता येईल. निव्वळ संशयावरून किंवा पोलिस म्हणतात म्हणून एखाद्याला तुरुंगात टाकले जाते. विरोधी पक्षाच्या राजकीय कार्यकर्त्यांना छळण्याचा हा नेहमीचा मार्ग असतो. नव्या कायद्यामुळे तब्बल तीन महिने असा छळ करण्याचा परवानाच पोलिसांना मिळणार आहे. याचा कडाडून विरोध केला जाण्याची गरज आहे. शिवाय हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेले पाहिजे. लग्नाचे वचन देऊन शरीरसंबंध ठेवले या आरोपाखाली आता दहा वर्षांची शिक्षा होणार आहे. हा गुन्हा गंभीर आहे व खरेच जो गुन्हेगार असेल त्याला सजा मिळायलाच हवी. मात्र या गुन्ह्याच्या नावाखाली निरपराधांना तुरुंगात डांबले जाण्याची भीती आहे. आपल्याकडे लिव्ह इन संबंधांमध्ये असलेल्यांचा मृत्यू झाल्यावर लव्ह जिहाद म्हणून ओरड करणाऱ्यांची नवी जमात तयार झाली आहे. भाजपचे मंत्री व खासदारही त्यात सामील आहेत. अशांच्या दबावाखाली या कायद्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. आरोपीच्या अनुपस्थितीत खटला चालवला जाण्याबद्दलच्या नव्या तरतुदीही संदिग्ध आहेत. यूएपीएसारख्या खटल्यांमध्ये आपण निरपराध आहोत हे आरोपीला सिध्द करायचे असते. पण तिथे तिथे समजा आरोपीच्या गैरहजेरीत खटला चालवला गेला तर पोलिसच फिर्यादी आणि पोलिसच न्यायाधीश असा प्रकार होण्याची शक्यता आहे, नव्या कायद्यात काही चांगले बदलही आहेत. आरोपीला अटक करतानाचे व्हिडिओ शूटिंग अनिवार्य करणे, पहिल्या सुनावणीनंतर साठ दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करणे आणि खटला पूर्ण झाल्यावर दीड महिन्यात त्याचा निकाल लावणे अशी बंधने त्यात घालण्यात आली आहेत. मात्र घातक बदलांची पुरेशी चर्चा न होता ही नवी व्यवस्था अमलात येणे हे आक्षेपार्ह आहे. विरोधकांनी त्याची तड लावायला हवी.

विचार

# नव्या आशा-अपेक्षांची पेरणी

***नवीन सरकारचा कार्यकाळ आणि पाऊस एकाच वेळी सुरू होणे, या योगायोग नव्या उमेदीची पेरणी करणारा आहे. एनडीएच्या या तिसऱ्या कार्यकाळात मंत्रिमंडळातील कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे समस्त शेतकरीवर्ग आशेने बघत आहे. मुळात शेतीक्षेत्रातील जाणकार असल्यामुळे तसेच मध्य प्रदेशमध्ये मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना घेतलेल्या सकारात्मक निर्णयांमुळे त्यांच्यावरील अपेक्षांना पालवी फुटणे स्वाभाविक आहे.***

**प्रा.डॉ. मुकुंद गायकवाड**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शपथ घेतल्यानंतर पहिली स्वाक्षरी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी असणाऱ्या बिलावर करुन या वर्गाला दिलासा दिलाच पण या पावलाद्वारे पुढील पाच वर्षांसाठीचे सरकारचे लक्ष्य आणि उद्दिष्ट शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी असल्याचे सूतोवाचही केले. गेल्या दहा वर्षांमध्ये मोदींच्या मंत्रिमंडळात शेती जाणणारा एकही तज्ज्ञ नसल्याची तक्रार या वर्गाकडून वारंवार गेली जात होती. परंतु, नव्या राजवटीमध्ये मध्य प्रदेशचे माजी लोकप्रिय मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना केंद्रीय कृषीमंत्रीपद देऊन त्यांनी ही त्रुटी दूर केली. शिवराजसिंह यांनी मुख्यमंत्रीपदाच्या कालावधीमध्ये मध्य प्रदेशची स्थिती राज्याचाच नव्हे, तर देशाच्या दृष्टीकोनातून प्रगतीपथावर आणल्यामुळे आताही ते तशीच कामगिरी बजावतील, या आशेने शेतकरीवर्गामध्ये समाधान आणि आनंद बघायला मिळत आहे.

तसा विचार करता देशातील शेतकरीवर्ग जगाच्या मानाने खूपच मागे राहिलेला आणि एका अर्थी अगदी 'दलित वर्गात' मोडणारा आहे. गेल्या ७५ वर्षांमध्ये केंद्रात ६४ टक्के शेतकरी समाजाला दिलासा देणारा कृषीमंत्री लाभला नव्हता. त्यामुळे नव्या कृषीमंत्र्यापुढे देशाची कृषी व्यवस्था सुधारण्याचे फार मोठे आव्हान आहे. नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध असणारी उत्तर प्रदेश, बंगाल, ओरिसा ही राज्ये देशातील सर्वात गरीब समजली जातात, कारण तेथील लोकांचा ओढा कोकणाप्रमाणेच शेती सोडून समृद्ध शहरांकडे पळण्याचा दिसतो. तिथेही शेतीची दुरवस्था झाली आहे. एके काळी बिहार, उत्तर प्रदेश आदी राज्ये समृद्धीच्या शिखरावर होती. पण आता ती तळागाळाला गेली आहेत. याचे कारण तेथील राजवटीने शेतीकडे केलेले दुर्लक्ष हेच आहे. एकट्या उत्तर प्रदेशमध्ये संपूर्ण देशाचीच नव्हे तर जगाची भूक भागवण्याची क्षमता आहे. आपल्याकडील दोन जिल्ह्यांइतकी व्याप्ती असणारा, वाळवंटी, पाण्याचे दुर्भिक्ष असणारा इस्त्रायलसारखा देश जगाला शेतीमाल निर्यात करुन आघाडीवर राहू शकतो तर त्या मानाने आपला उत्तर प्रदेश किती मोठा प्रदेश आहे, हे वेगळे सांगायला नको! मात्र गंगा आणि यमुनेसारख्या नद्यांनी सुपीक केलेला आपला भूभाग शेतीला जुगार समजण्याच्या प्रवृत्तीमुळे तसेच ७५ वर्षांमध्ये 'उत्तम शेती' न मानल्यामुळेच आज पिछाडीवर पडला आहे. देशातील अनेक भागांमधील शेती पडीक अवस्थेत आहे.

हे चित्र बदलून देशाला आर्थिक महासत्ता बनायचे असेल तर आता नव्या सरकारने पुढाकार घेणे गरजेचे आहे. आणि खऱ्या अर्थाने शेती समृद्ध झाल्याशिवाय शाश्वत विकास साधता येणार नसल्याचे मोदी सरकारने ओळखल्यामुळे या क्षेत्रातील जाणकार कृषीमंत्री दिला आहे. हा बदल शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित करणारा आहे. अर्थातच नवीन कृषीमंत्र्यांपुढे अनेक आव्हाने असणार आहेत. त्याचा उहापोह करता लक्षात घेण्याजोगी पहिली बाब म्हणजे हमीभाव आणि इस्त्रायलप्रमाणे शेतीमालाला अधिक भाव असणाऱ्या ठिकाणी विक्री करण्याची यंत्रणा निर्माण करुन, शेतीमालाची निर्यात वाढवून शेतकऱ्यांच्या हाती अधिकाधिक पैसा कसा खेळता राहील हे बघणे. खेरीज आता अन्य व्यापाराप्रमाणे शेतीमालाचा व्यापारही सरकारी निर्बंधांमधून मुक्त झाला पाहिजे, कारण ॲडम स्मिथ यांनी लिहिलेल्या 'वेल्थ ऑफ नेशन' या पुस्तकातील, 'सरकारने कृषीव्यापार मुक्त केला तरच देशाला समृद्धी मिळते' हे विधान अमेरिकेसारख्या कृषीक्षेत्रातील आघाडीवर असणाऱ्या सर्व देशांनी अवलंबले आहे. त्यामुळेच त्या त्या देशांमध्ये कृषीक्षेत्राची प्रगती झाली आहे. आपण एकीकडे व्यापाराला मुक्त केले पण दुसरीकडे कृषीला बंदिस्त ठेवले. त्यामुळे शेती आणि शेतकरी मागासच राहिला. ही अवस्था बदलण्याचे धाडस नूतन सरकारने केले तर आपला शेतकरी भारतातच नव्हे तर परदेशातही माल विकू शकेल आणि समृद्धीची फळे त्याच्याही पदरात पडतील.

आत्ताचे धोरण या कल्पनेला खीळ घालणारे आहे. आपला शेतकरी परदेशात सोडा, पण देशातही आपल्या मर्जीने शेतमाल विकू शकत नाही, कारण शेती हा राज्याचा विषय आहे आणि प्रत्येक राज्यामध्ये शेती व्यापारविषयक वेगवेगळे कायदे आहेत. त्यामुळे देशात शेतीव्यापाराचे एक धोरण आणि शेतकऱ्यांना जगात कुठेही जाऊन आपला माल विकण्याची मुभा या दोनच गोष्टी शेतकरी आणि शेतीला समृद्धी देऊ शकतात. आत्तापर्यंत आपण शेतकऱ्यांना कर्जमाफीद्वारे किंवा अवकाळीमध्ये पीकहानी झाल्यास आर्थिक मदतीच्या कुबड्या देऊन पांगळे केले आहे. प्रत्यक्षात त्याला याची अजिबात गरज नाही. त्याला वेळेत वीज, पाणी, निर्बंधयुक्त व्यापार, खते, भांडवलाचा यथायोग्य पुरवठा, व्यापारातील आधुनिक सुविधा मिळणे गरजेचे आहे. थोडक्यात, त्याला कृषीला लागणाऱ्या साहित्याची उपलब्धता गरजेची असून इतर क्षेत्रांप्रमाणे शेतीलाही व्यापार समजणे गरजेचे आहे. एखाद्या एम आयडीसीमध्ये उद्योगाला बळकटी देण्यासाठी सर्व यंत्रणा उपलब्ध करुन दिली जाते, त्याच प्रकारची यंत्रणा शेतीसाठीही असायला हवी. तरच हे क्षेत्र नफ्यातील व्यापार म्हणून आकार घेईल.

यासाठी नव्या सरकारने शेतकरी संरक्षण कायदा करण्याची गरज आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात होणारे दलितांचे हाल स्वतंत्र भारतात संविधान आल्यामुळे तसेच दलितांसाठी समाजहिताचे अनेक कायदे झाल्यामुळे संपले. आज त्यांची परिस्थिती मोठ्या प्रमाणात सकारात्मक रितीने बदलली आहे. या पार्श्वभूमीवर वर उल्लेख केलेल्या कायद्याचे संभाव्य यश बघावे लागेल. या कायद्यातील मुख्य तरतुदींचा विचार करायचा तर सर्वप्रथम स्वतंत्र कृषी जमीन न्यायालय उभे राहायला हवे. दुसरे म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जगातील सर्व बाजारपेठांचे भाव शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्यासाठी नवीन ॲप्स तयार करणे गरजेचे आहे. सध्या बी-बियाणे, खते यात मोठ्या प्रमाणात काळा बाजार आहे. बियाणे उगवले नाही तर आजचा कायदा कंपनीला कोणत्याही प्रकारचा दोष देत नाही. म्हणूनच आज शेतकरी संरक्षण कायद्याची आत्यंतिक गरज आहे. खेरीज सरकारने किमान हमीभावाची योजना लागू केली आहे. सध्याचा व्यापारी त्याला महत्त्व देत नाही. मग त्यांच्यावर कायदेशीर कारवाई कोण करणार, शेतकरी संघटना कधी उभी राहणार हे मुद्देही कायद्यांतर्गत यायला हवेत. तसेच रेल्वे वा विमान कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या नाशवंत मालासाठी वाहतुकीची सोय करण्याची 'गॅरेंटी' या कायद्याने मिळायला हवी. तरच वाहतूक सुविधा उपलब्ध करुन दिली गेली नाही आणि नुकसान झाले तर त्याचा भार संबधित यंत्रणेवर पडून शेतकरी आश्वस्त होऊ शकेल.

पीकविम्यावर शेतकऱ्यांचा अद्याप विश्वास नाही. हा अविश्वास दूर करण्यासाठी पीकविम्याबाबत शेतकरी हा 'वैयक्तिक घटक' म्हणून विचारात घेतला जावा आणि विम्याचे पैसे वेळेवर देण्याची तरतूद व्हायला हवी. त्याचबरोबर कृषी उत्पादनाबाबत देशात, राज्यात, जगात असणारे बाजारभाव कळण्यासाठी शेअर बाजाराप्रमाणे यंत्रणा निर्माण होणेदेखील गरजेचे आहे. यामुळे शेतकऱ्याला घरबसल्या सगळीकडील बाजारभावांची माहिती मिळणे आणि तुलनात्मक अभ्यास करुन निर्णय घेणे सुलभ होईल. महत्त्वाचे म्हणजे आता तरी अतिजलद न्याय करणारी शेतकरी जिल्हा ट्रिब्युनल्स स्थापन केली पाहिजेत. यामुळे शेतकऱ्यांना अतिजलद न्याय मिळणे शक्य होईल. आताच्या प्रगत आणि आधुनिक भारतात शेतकऱ्यांना दिलेल्या सवलतीही अमेरिका, इस्त्रायल आदी प्रगत देशांसारख्या असल्या पाहिजेत. उदाहरणार्थ या देशांनी शेतीमाल निर्यातीसाठी तज्ज्ञांमार्फत जगांच्या बाजारपेठांचा अभ्यास करुन, प्रकल्प अहवाल तयार करुन, संबंधित माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून कोणत्या देशात, कोणत्या वेळी, कोणत्या मालाला मागणी असते, ही माहिती पुरवण्याची यंत्रणा तयार केली आहे. त्याचप्रमाणे आपणही शेतीचा नवा ढाचा तयार करणे गरजेचे आहे.

सध्याची संपूर्ण देशातील शेती परंपरागत हंगामात अडकली आहे. अशा आधुनिक पद्धतीने आणि संरचनेने माहिती उपलब्ध झाली आणि शेतकऱ्यांना पैसे मिळण्याची खात्री झाली तरच हा वर्ग या पद्धतीचे तंत्रज्ञान वापरुन देश-विदेशातील बाजारपेठ काबीज करु शकेल. त्यांच्या समृद्धीचा हा मार्ग देशालाही नव्या वाटेवर नेईल. इस्त्रायलला शेतीमाल निर्यातीपासून सर्वाधिक उत्पन्न मिळते. मग आपल्या देशाने असे धोरण का राबवू नये? त्यांनी शेतीमाल निर्यातीसाठी निर्माण केलेल्या 'ॲग्रेस्को'सारख्या यंत्रणेचे अनुकरण नव्या सरकारने करायला हवे.

आज आपली शेतीमाल निर्यात अगदी नगण्य आहे, कारण आपण केवळ कारखानदारी आणि व्यापारी निर्यातीवरच भर दिला आहे. खरे पाहता शेतीप्रधान समजल्या जाणाऱ्या देशाच्या निर्यातीमध्ये शेतीमाल निर्यातीपासून सर्वाधिक लाभ व्हायला हवा होता. त्यामुळेच योग्य पद्धतीने विचार केला तर ही अवस्था आणि व्यवस्था बदलू शकेल. नवीन राजवट आणि कृषीमंत्र्यांनी या सर्व मुद्द्यांकडे लक्ष दिले तर शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने सुदिन उजाडू शकेल.

आजकाल

# म्युच्युअल फंड योजनांची वाढती लोकप्रियता




म्युच्युअल फंड उद्योगाने या वर्षी एप्रिल आणि मे मध्ये ८१ लाख नवीन गुंतवणूकदार खाती जोडली. लोक मुदत ठेवींकडे पाठ फिरवत असताना म्युच्युअल फंड उद्योगाने २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांमध्ये (एप्रिल आणि मे) ८१ लाखांहून अधिक गुंतवणूकदार जोडले आहेत. सतत मार्केटिंग, सेलिब्रिटींचे समर्थन आणि वितरण नेटवर्कच्या चांगल्या कामगिरीमुळे ही वाढ झाली आहे.

शेअर बाजाराच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे गुंतवणूकदार म्युच्युअल फंडाकडे अधिक वळत आहेत. याशिवाय, मुदत ठेवींबाबत गुंतवणूकदारांची धारणाही बदलत आहे. मुदत ठेवी पुढे म्युच्युअल फंडाप्रमाणे परतावा देऊ शकणार नाहीत. उद्योगातील म्युच्युअल फंड फोलिओची संख्या मे अखेरीस १८.६ कोटींवर पोहोचली आहे. 'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया' (एएमएफआय) च्या आकडेवारीनुसार, मे अखेरीस उद्योगातील म्युच्युअल फंड फोलिओची संख्या १८.६ कोटी होती. हा आकडा मार्चअखेरच्या १७.७८ कोटींपेक्षा ४.६ टक्के किंवा ८१ लाख अधिक आहे. हा वैयक्तिक गुंतवणूकदारांच्या खात्यांना दिलेला क्रमांक आहे.

'एएमएफआय'च्या मते, गुंतवणूकदाराकडे अनेक फोलिओ असू शकतात. म्युच्युअल फंड उद्योगातही अशीच वाढ सुरू राहील अशी पूर्ण अपेक्षा आहे. शेअर ट्रेडिंग प्लॅटफॉर्म 'ट्रेडजिनी'चे 'सीओओ' त्रिवेश डी यांनी सांगितले की, म्युच्युअल फंड बाजाराच्या शक्यता बळकट झाल्या आहेत. शेअर बाजारात सध्या सुरू असलेली तेजी, उत्तम जोखीम व्यवस्थापन, गुंतवणूकदारांचे शिक्षण आणि उत्तम मार्केटिंग यामुळे अधिकाधिक गुंतवणूकदार म्युच्युअल फंड उद्योगाशी जोडले गेले आहेत. भविष्यातही हाच वेग कायम राहील, अशी आशा आहे.

भारताचे दरडोई उत्पन्न वाढत जाईल, तसतसे गुंतवणूकदार महागाईवर मात करण्यासाठी आणि भांडवल निर्माण करण्यासाठी म्युच्युअल फंडातील गुंतवणूक वाढवतील. यामुळे म्युच्युअल फंडांची पोहोच वाढेल. डिजिटल माध्यमातून येणाऱ्या गुंतवणूकदारांमध्ये तरुणांची संख्या अधिक आहे. बहुतेक नवीन गुंतवणूकदार डिजिटल चॅनेलद्वारे येत आहेत. यामध्ये तरुणांची संख्या खूप जास्त आहे. एकूण ८१ लाख फोलिओंपैकी सुमारे ६१ लाख इक्विटी आधारित म्युच्युअल फंडांमध्ये आले आहेत. यामुळे अशा फोलिओची संख्या १२.८९ कोटी झाली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये शेअर बाजाराच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे ही संख्या वाढली आहे. याशिवाय क्षेत्रीय आणि थीमॅटिक फंडांची वाढही उत्कृष्ट झाली आहे.

लोकसंसद

## अशा ठिकाणी प्रशासनाने सतर्क राहावे

वर्षा पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या लोणावळ्याच्या भुशी धरणाच्या परिसरातील धबधब्याच्या पाण्याच्या प्रचंड प्रपातात एकाच कुटुंबातील दहा जण वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली. सुदैवाने त्यांच्यापैकी पाच जणांना बाहेर काढण्यात यश आल्यामुळे त्यांचे प्राण वाचले. या दुर्दैवी घटनेचा एक व्हिडीओ समाज माध्यमात वायरल झाला असून मनाला वेदना देणारा आहे. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरु झाला की पावसाळी पर्यटनात जीव गमावणाऱ्या अशा अभागी जीवांच्या अनेक दुर्दैवी घटनांचा ओघ सुरु होतो. गेल्या काही वर्षात समाज माध्यमात राज्यभरातील पावसाळी पर्यटनात घडलेल्या अशा जीवघेण्या दुर्घटनांचे अनेक व्हिडीओ वायरल झालेले आहेत. त्यामुळे खरे तर पावसाळी पर्यटन करताना सावधानता बाळगावी, जीवाची काळजी घ्यावी, इतरांना सावध करावे हेच जाणत्या पर्यटकांकडून अपेक्षित आहे. परंतु तरीही अशा दुर्घटना वारंवार घडत राहतात याला काय म्हणावे, काहीच कळत नाही. अशा धोकादायक ठिकाणी पर्यटकांच्या उत्साहाला आवर घालण्यासाठी प्रशासनाची उपस्थितीही आवश्यक आहे. नाहीतर अशा प्राणघातक दुर्दैवी घटना घडण्याचे सत्र थांबणार नाही.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२ जुलै**

**१८६५:-** नाटककार, निबंधकार, कवी कृष्णाजी लक्ष्मण सोमण यांचा जन्म. टिळक प्रेमापोटी 'हिंदोल टिळक गीत' ही काव्यरचना. 'पानिपतचा दुर्दैवी मोहरा','विजयनगरचा डळमळता राजमुकुट', 'माझी बहीण' मिळून २५ ऐतिहासिक, पौरोणिक नाटके लिहिली. 'किरात कालदंड','मधुकर','सारथी' या टोपण नावांनी त्यांनी लिखाण केले. **१८८०:-** 'माझी भुमिका' या आत्मचरित्रातून मराठी रंगभूमीचा इतिहास उलगडणारे गायक, अभिनेते गणपतराव बोडस यांचा जन्म. रंगभूमीच्या कारकिर्दीचा श्रीगणेशा किर्लोस्कर संगीत मंडळीत केला. तेथे त्यांनी सौभद्रमध्ये 'सौभद्रमध्ये कृष्ण','शारदामध्ये कांचनभट','मूकनायकात विक्रांत' तर 'मानापमान मध्ये लक्ष्मीधर' अशा भूमिका केल्या. १९१३ च्या सुमारास टेंबे आणि बालगंधर्वच्या सहाय्याने 'गंधर्व नाटक मंडळ' ही संस्था स्थापली. या मंडळीच्या 'एकच प्याला' मधील सुधाकर, मृच्छकटिकमधील शकार, संशयकल्लोळमधील फाल्गूनराव' ह्या भूमिका गाजल्या. नाशिक येथे १९४० साली भरलेल्या मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपदी त्यांनी भुषविले होते. **१९१६:-** वैद्यकीय ग्रंथांचे भाषांतरकार, लेखक, कवी गणेश कृष्ण गर्दे यांचे निधन. 'सार्थ वाग्भट' आणि 'सार्थ माधवदिन' या वैद्यकांवरील संस्कृत ग्रंथाचे त्यांनी मराठीत भाषांतर केले. याशिवाय 'सटीप ईशगुणदर्शन','सार्थ व रामश्लोकी शिवमहिमा' आणि 'उपमन्यु शिवस्तोत्र' ही त्यांनी संस्कृतमधून भाषांतरीत केलेली काव्यरचना आहे. **१९१६:-**लेखक प्रा. वामन शिवराम आपटे यांचा जन्म. शेक्सपिअरच्या ३७ नाटकांचे भाषांतर करणारे आपटे कामगार चळवळीतही सक्रिय होते. यावर आधारित 'कारखाना कामगाार कायदा' या पुस्तकांसह 'अभ्यास कसा करावा?', 'चिंता का करता?', 'ध्येय कसे गाठाल?', 'नोकरी कशी मिळवावी?', 'भाषणे कशी करावीत?', 'मित्र कसे जोडावे?', 'व्यक्तिमत्व कसे सुधारावे?', 'श्रीमंत कसे व्हावे?' अशा आगळया वेगळया पुस्तकांसह, 'अशी उमलते कळी' ते 'प्रीत जगावेगळी' मिळून वीस कादंबऱ्या, 'गजरा मोतियांचा','निबंध लेणी' हे लघुनिबंध तसेच कथा, चरित्र अशी विपूल साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **१९२६:-** विनोदी लेखक विनायक आदिनाथबुवा यांचा जन्म. ५० वर्षे सातत्याने लेखन करुन १५०च्या आसपास पुस्तके प्रकाशित. 'अकलेचे तारे','एक ना धड','चौदावे रत्न','शंभरावं पुस्तक' आदी कथासंग्रह प्रसिध्द. याशिवाय विविध मासिके, नियत कालिकेतून सातत्याने व विनोदी लेखन त्यांनी केले. आकाशवाणीवरील श्रृतिका, प्रहसन, पटकथा, तमाशाची संहिता व एकांकिका असे विपूल लेखन त्यांनी केले. सहजसुंदर विनोद हे त्यांच्या लेखनीचे वैशिष्ट्ये. मानवी स्वभाव, त्यांच्या सवयी, लकबी यांचे सुक्ष्म विवेचन त्यांच्या लेखणीतून साकारले. **१९२९:-** इतिहासाभ्यासक पुरुषोत्तम विश्राम भावजी यांचे निधन. द. ब. पारसनीसांच्या सहकार्याने पेशवे दफ्तरांच्या १०, ११, १२, व १३ या खंडाचे संपादन त्यांनी केले. मावजी यांनी 'सुवर्णमाला' नावाचे मासिकही काही काळ चालवले होते. ह्यांनी 'दक्षिणेतील सरदारांच्या कैफियती', 'वर्तमानपत्र-निवाडपत्रे','सनद पत्रांतील माहिती','तह व करारमदार' असे ग्रंथ लिहिले. **१९३७:-** वृत्तपत्र स्तंभलेखक, कथाकार, कवी जयराम पांडुरंग कामत यांचा जन्म. 'क्रांतिदूत', 'अंधारयात्री', 'खुखिया' या कथा संग्रहासह 'गुलमोहर' हे ललित लेखसंग्रहाचे पुस्तक प्रसिध्द. **१९४५:-** कवी अनंत कृष्णाजी बावने यांचा जन्म. 'साय','अमृत झरा', 'विरंगुळा' हे काव्यसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९६१:-**'एका मारवाड्याची गोष्ट' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक डॉ. गिरीश प. जखोटिया यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'वंश' हे इंडस्ट्रिजच्या भ्रष्टाचारावर तसेच 'यशाच्या उदयोगाचे ३६ मंत्र', 'कृष्णनिती', 'चला बदल घडवू या','आक्रमण', 'छत्रपती शिवाजी महाराज आणि २१ वे शतक', 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि २१ वे शतक' ही वेगळ्या धाटणीच्या पुस्तकांसह 'तरंग' आणि 'एका मारवाड्याच्या कविता' हे काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९६२:-** गझलेत आध्यामिकता आणणारे आणि प्रेम व दारुत अडकलेल्या गझलेला वात्सल्यपूर्ण कौटुंबिकता प्राप्त करुन देणारे गझलकार श्री. प्रदीप निफाडकर यांचा जन्म. पत्रकार म्हणूनही ते सुपरिचित आहेत. त्यांचा पहिला गझलसंग्रह होता. 'स्वप्नमेणा'. 'गझल' या काव्यप्रकाराची साद्यंत माहिती देणाऱ्या 'गझलदीप' या पुस्तकांशिवाय 'वेगळे वाटसरु' हे त्यांचे व्यक्तिचित्रणाचे व जैन धर्मातील २४ तीर्थंकरांवरील गाणी ही त्यांची अन्य पुस्तके आहेत. गुरुवर्य सुरेश भट यांच्या अप्रकाशित कवितांचे संपादन 'रसवंतीचा मुजरा' या नावाने केले असून 'आई' या विषयावरील भारतातील सर्व भाषा तसेच नेपाळी, इंग्रजी भाषेतील कवितांचे संपादनही त्यांनी केले, त्याचे 'माँ' नावाचे पुस्तक प्रसिध्द झाले आहे. महाराष्ट्रातील ८५ नव्या दमाच्या मराठी गझलकारांच्या निवडक गझलांचे 'आवडलेल्या गझला' या पुस्तकाचेही संपादन त्यांनी केले आहे. त्यांच्या मराठी गझलांची 'देखणी' ही ध्वनिफीत ही प्रकाशित झाली आहे. इयत्ता दहावीच्या पाठयपुस्तकात तसेच मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए.च्या अभ्यासक्रमात त्यांच्या गझलेचा समावेश झाला असून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात वृत्तविद्या अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तकात त्यांनी भरपूर लेखन केले आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ जुलै

१) श्री. पुरूषोत्तम दत्तोत्रय साठे अलिबाग, २-७-१९५०
२) श्री. सुभाष रामचंद्र चेवले अलिबाग, २-७-१९५०
३) श्री. श्री हनुमंत ज्ञानदेव पालेकर रामनाथ अलिबाग, २-७-१९५३
४) श्री.संजय द्वारकानाथ जोशी ब्राम्हणआळी, २-७-१९५७


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखलअसलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल


### आजचे अन्नदाते



आरोही गणेश गवळी, वाढदिवस



कै. दगडू बना काळे ( चोंढी चणेवाले), पुण्यतिथी, अलिबाग



कै. वासुदेव मल्लिकार्जुन बेत, स्मरणार्थ अलिबाग

# धरण क्षेत्रात दमदार पाऊस

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**चार दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसाने रायगडमधील धरण साठ्यात वाढ झाली आहे. लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारित असलेल्या प्रकल्पातील पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. २८ प्रकल्पांत ४९.६० टक्के पाणी साठा जमा झाला आहे. रोहा तालुक्यातील सुतारवाडी आणि म्हसळा तालुक्यातील संदेरी आणि पाभरे ही धरणे पूर्ण क्षमतेने भरली असून अतिरिक्त पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येत आहे.**



जूनच्या सुरुवातीला कोलाड येथील लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेल्या २८ प्रकल्पांत केवळ २३ टक्के पाणी साठा शिल्लक होता. यातील ९ धरणांमध्ये दहा टक्क्यांहून कमी पाणी साठा शिल्लक होता. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील अनेक भागात पाणीटंचाई जाणवत होती. आठवडाभरापूर्वी यात केवळ चार टक्के वाढ झाली होती.

जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पावसाने पाठ फिरवल्याने परिस्थिती बिकट झाली होती. मात्र २४ जूननंतर जिल्ह्यात मॉन्सून पुन्हा चांगल्याप्रकारे सक्रिय झाला आहे. चार दिवसांपासून पावसाच्या जोरदार सरी कोसळण्यास सुरुवात झाली आहे. धरणच्या क्षेत्रातही समाधानकारक पावसाची नोंद झाली आहे. १ जूनपासून जिल्ह्यात ५९६ मिलिमीटर इतका पाऊस पडला आहे. घाटमाथ्यावर जोरदार पाऊस पडत असल्याने जिल्ह्यातील नद्या पूर्ण क्षमतेने वाहू लागल्या आहेत. त्यामुळे धरणांच्या पाणी पातळीत चांगली वाढ झाली आहे. ६४.२६१ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा धरणांमध्ये जमा झाला आहे. अलिबाग श्रीगाव आणि मुरूड फणसाड या दोन धरणांचा अपवाद सोडला तर इतर धरणांच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. जिल्ह्यातील पाच धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. अन्य चार धरणे ५० टक्के भरली आहेत. प्रादेशिक हवामान विभागाने रायगड जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

### उपलब्ध पाणीसाठा

**० ते १० टक्के** फणसाड, श्रीगाव,
**११ ते ३० टक्के** कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कवेळे, उन्हेरे, रानवली, कोलते-मोकाशी, डोणवत, पुनाडे
**३१ ते ५० टक्के** कार्ले, खैरे, मोरबे, बामणोली,
**५१ ते ७५ टक्के** आंबेघर, कुडकी, भिलवले, उसरण
**७६ ते ९९ टक्के** कोथुर्डे आणि वावा.

### तालुकानिहाय धरणे

**मुरुड (१), तळा (१), रोहा (१), पेण (१), अलिबाग (१), सुधागड (५), श्रीवर्धन (३), म्हसळा (२), महाड (४), कर्जत (२), खालापूर (३), पनवेल (३), उरण (१) या तेरा तालुक्यात २८ धरणे बांधली गेली आहेत. या धरणातून जिल्ह्यातील तसेच जिल्ह्यातील नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. जिल्ह्यातील २८ धरणांत ६८.२६१ दलघमी पाण्याच्या साठ्याची क्षमता आहे.**

# विनामूल्य करिअर मार्गदर्शन

**। उरण । वार्ताहर ।**

दहावी आणि बारावीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या पुढील भविष्यासाठी योग्य असे विनामूल्य करियर विषयक मार्गदर्शन मिळावे या अनुषंगाने नागाव म्हातवली ओएनजीसी सेवानिवृत्त सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व करियर मार्गदर्शन शिबीर माऊली मंगल कार्यालय, भोईवाडी, नागाव रोड, म्हातवली उरण येथे आयोजित करण्यात आले.

दहावी आणि बारावीनंतर विदयार्थ्यांनी कोणते क्षेत्र निवडावे, शासकीय निमशासकीय विभागातील नोकरीच्या संधी. स्वयंरोजगार, उद्योग, विविध कोर्स व त्याचे फायदे, एम पीएससी, यूपीएससी स्पर्धा परिक्षेची माहिती, केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी,अभ्यास कसा करावा आदी सविस्तर अगदी सोप्या भाषेत माहिती करिअर मार्गदर्शक सुहास पाटील यांनी विद्यार्थी व पालकांना दिली.

उपस्थित विद्यार्थ्यांनी सुध्दा वेगवेगळे प्रश्न विचारले होते त्याचे समाधानकारक उत्तरे सुहास पाटील यांनी दिली.विद्यार्थ्यांच्या शंका, प्रश्नाचे सुहास पाटील यांनी उत्तम प्रकारे निरसन केले. सदर कार्यक्रमाला विद्यार्थी वर्गासोबत पालकांचाही उत्तम प्रतिसाद लाभला. करियर मार्गदर्शनानंतर शेवटी दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. चांगल्या कार्यक्रमाचे उत्तम आयोजन व नियोजन केल्याने सदर कार्यक्रमाचे विद्यार्थ्यांनी व पालकांनी कौतुक केले.सदर कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन प्रवीण घरत यांनी तर आभार प्रदर्शन सचिव ॲड. अरुण थळी यांनी केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागाव म्हातवली ओएनजीसी सेवानिवृत्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर घरत, उपाध्यक्ष माधव बिश्वास, महेंद्र म्हात्रे, अरुण पाटील, विकास माळी, रमेश नाईक, हितेंद्र म्हात्रे, एच.पी.कडू, नरेंद्र गायकवाड, गजानन म्हात्रे तसेच सर्व संस्थेच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

# विविध जातींच्या वृक्षांची लागवड

**। रसायनी। वार्ताहर।**

दिव्य ज्योति जाग्रति संस्थान, शाखा चाकण द्वारा संचालित जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मोहोपाडा रसायनी क्षेत्रामध्ये संस्थानच्या 'संरक्षण' प्रकल्पाअंतर्गत सामुदायिक वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन रविवारी करण्यात आले होते.यावेळी मोहोपाडा येथील जनता विद्यालय, रिस मैदान, टाकेदेवी दांडफाटा, एमआयडीसी डोंगर आदी परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश मोहोपाडा सोबतच संपूर्ण भारतामध्ये पर्यावरणीय स्थिरता आणि समुदाय प्रतिबद्धता वाढवणे ही असून या उपक्रमामध्ये स्थानिक शाळा, व्यवसाय आणि रहिवाशांच्या अंदाजे १०० स्वयंसेवकांचा समावेश असलेला एक सहयोगी प्रयत्न आहे. संगठित व सामूहिक प्रयत्नाने नियुक्त केलेल्या ठिकाणी अंदाजे २०० ते ३०० झाडे लावण्यात आली.यावेळी विविध पोस्टर्सच्या माध्यमाने जनमानसात पर्यवरणा विषयी संदेश देण्याचा प्रयत्न संस्थानच्या स्वयंसेवकांनी केला.



सतत होत असलेल्या पर्यावरणीय संकटाला लक्षात घेऊन दिव्य ज्योति जाग्रति संस्थानद्वारा संरक्षण प्रकल्पाच्या अंतर्गत पर्यावरण संतुलनाला पुन्हा स्थापित करण्यासाठी जल संरक्षण, झाडाची कटाई थांबवण्यासाठी वनसंरक्षण, उर्जा संकटांना पूर्ण करण्यासाठी ऊर्जा संरक्षण असे उपक्रम ठिकठिकाणी राबवण्यात येत आहेत.

## बत्ती गुलमुळे खोपोलीकर बेजार

**खोपोली :** महावितरणकडून दर मंगळवारी दिवसभर देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी वीज पुरवठा खंडित केला जातो, तरीही खोपोली व परिसरात दररोज कोणतीही पूर्वसूचना न देता वारंवार वीजपुरवठा खंडित केला जातो. शनिवारी संध्याकाळपासून शहरात वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे मध्यरात्री साडेबारापर्यंत संपूर्ण शहर अंधारात होते. एकीकडे उकाडा तर दुसरीकडे डासांची भूणभूण त्यामुळे नागरिक पुरते हैराण झाले. वारंवार उद्भवणाऱ्या वीज समस्येमुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

# सुधीरकुमार यादव यांचा सेवापूर्ती सन्मान

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर।**

सुधीरकुमार यादव यांची एलआयसीसारख्या अग्रगण्य संस्थेत विकास अधिकारी पदावर ४१ वर्षे कार्यरत राहून १०० हून अधिक अभिकर्त्यांना योग्य प्रशिक्षणाद्वारे प्रोत्साहित करून ठाणे विभागात सलग ३५ वर्षे पॉलिसी रक्कम, पॉलीसी संख्या आदी आयामावर सर्वोत्तम कामगिरी केली. अभिकर्त्यांसह जनसामान्यांच्या जीवितासाठी विमा कवच उपलब्ध करून त्यांना बचतीच्या माध्यमातून विम्याचे महत्व अधोरेखित केले. हजारो कुटुंबियांना आर्थिक स्थैर्य दिले, असे विकासअधिकारी सुधीरकुमार यादव यांच्या सन्मानार्थ सेवापूर्ती समारंभाचे शानदार आयोजन शाखा प्रबंधक नरेश स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

मुरुड, रोहा आणि सुधागड पाली या तीन तालुक्यातील कार्यक्षेत्रातील आघाडीचे सर्व वीमा सल्लागार यांनी पुढाकार घेत सुधीरकुमार यांच्या जीवनावर प्रेरणादायी आणि हृदयस्पर्शी लघुपट उपस्थितांसमोर सादर करून त्यांच्या जीवनाची संघर्षयात्रा उलगडून दाखवली. या प्रसंगी त्यांच्या जीवस्य, कंठस्य मित्रांसह अनेक अभिकर्त्यांनी त्यांच्यातील अनुशासन, सचोटी, कार्यतत्परता, सातत्य, संघर्ष आणि यश या आयामांवर आपल्या मनोगतातून भावना प्रदर्शित करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सुधीरकुमार यादव म्हणाले की, माझे संपूर्ण आयुष्याची गुंफण एलआयसी या तीन अक्षरांभोवती जडलेली आहे. ४१ वर्षे मला या संघटनेत जे काही काम करण्याची संधी मिळाली त्यात माझ्या मित्रांसह, कार्यालयीन वरिष्ठ, पदाधिकाऱ्यांचा तुम्हा अभिकर्त्यांचा वाटा आहे. मैत्रीचा ठेवा हीच माझी खरी श्रीमंती व संपत्ती आहे. यापुढेही मला सहकार्य करा असे विनम्र आवाहन त्यांनी केले.

# खांब-पालदाड रस्ता खचला

**। रोहा । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील खांब-पालदाडअंतर्गत देवकान्हे ते खांब हा नवीन रस्ता तयार करण्यात आला आहे. मात्र अवघ्या चार म हिन्यांत धानकान्हे येथे रस्ता खचला असल्याने कामाच्या दर्जाबाबत स्थानिकांकडून प्रश्न उपस्थित होत आहे.

खांब-पालदाड येथील दैनंदिन प्रवासी व वाहनचालक तसेच स्थानिकांच्या पाठपुराव्याने मार्चमध्ये या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. परंतु पहिल्याच पावसात धानकान्हे गावाच्या प्रवेशद्वाराजवळ रस्त्याचा काही भाग खचल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. या मार्गावर कायम रहदारी असते. त्यात अरुंद असल्याने वाहने समोरासमोर आल्यास अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित प्रशासनाने खचलेल्या रस्त्याची लवकरात लवकर डागडुजी करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात आली आहे.


# रेल्वे पुलाखालून जाणारा महामार्ग पाण्यात!

## रेल्वे आणि महामार्ग प्रशासनाचे दुर्लक्ष

**। माणगाव । वार्ताहर ।**

गेली चार दिवस पडत असलेल्या अतिवृष्टीमुळे पाण्याचा निचरा होत नसल्याने मुंबई गोवा महामार्गावरील ढालघर गावाजवळील रेल्वे पुलाखालून जाणाऱ्या या महामार्गावर पाणी साचत आहे. येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकांना हा रस्ता दिसत नाही. त्यामुळे अपघात होण्याची जास्त शक्यता आहे.

माणगाव पासून तीन कि.मी अंतरावर ढालघर गावाजवळ कोकण रेल्वे मार्ग जातो या कोकण रेल्वे मार्गावर रेल्वे प्रशासनाने पूल उभारला असून त्या पुलाखालून मुंबई गोवा महामार्ग गेला आहे. कोकण रेल्वे आपल्या गावाजवळ जात असल्याने आपला विकास होईल या उद्देशाने येथील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात चाळीस वर्षांपूर्वी कोकण रेल्वेला कवडी मोल किंमतीत जमिनी दिल्या. त्यावेळी कोकण रेल्वेने ट्रॅक टाकण्यासाठी मातीचे मोठ्या प्रमाणात भराव केले.



त्यामुळे वर्षानुवर्ष पडणारे पावसाच्या पाण्याचे नदीकडे जाणारे मार्ग बंद झाले. पावसाचे पाणी जाण्यास मार्ग नसल्याने ते ठिकठिकाणी तुंबले आहे.

रेल्वे पुलाखालून जाणाऱ्या महामार्गाचे दोन्ही बाजूंनी पाण्याचा निचरा होण्यासाठी रेल्वे प्रशासन किंवा महामार्ग प्रशासनाने गटार खोदणे गरजेचे होते. मात्र दोन्ही प्रशासनाने पाण्याचा निचरा करण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली नाही. त्याम ुळे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबले आहे. या तुंबलेल्या पाण्यामुळे ढालघर ग्रामस्थांची शेती ही संकटात सापडली आहे.

गेली चार दिवस सतत पडणाऱ्या अतिवृष्टीमुळे या परिसरात पाणी मोठ्या प्रमाणात तुंबले आहे. एका बाजूला कोकण रेल्वे मार्गाच्या भरावामुळे पाण्याचा निचरा होण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे हे पावसाचे पाणी महामार्गावरून वाहत आहे. मुंबई गोवा महामार्ग हा सतत रहदारीचा असल्याने महामार्गावर विशेषतः पावसाळ्यात जास्त अपघाताचे प्रमाण वाढत आहे. महामार्गावरून हे पाणी वाहत असल्याने वाहनचालकांना रस्ता दिसत नाही.

याबाबत ढालघर ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र या तक्रारीची दखल घेतली गेली नसल्याने ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. रेल्वे व महामार्ग प्रशासनाने या गंभीर प्रश्नांकडे डोळेझाक चालवल्याने ढालघर येथील काही ग्रामस्थ व माणगाव येथील मंगेश मेहता यांनी आपल्या स्वखर्चाने जेसीबीच्या सहाय्याने महामार्गालगत असणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी चर काढून साठलेल्या पाण्याला रस्ता मोकळा करून दिला. मंगेश मेहता यांनी सामाजिक जाणवेतून केलेल्या कामाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. मात्र रेल्वे आणि महामार्ग प्रशासनाने वर्षानुवर्ष चालवलेली डोळेझाक याबाबत परिसरातील ग्रामस्थ तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# माथेरानला पर्यायी व्यवस्था निर्माण करावी



**स्थानिकांची मागणी**

**। माथेरान । वार्ताहर ।**

अपुऱ्या पार्किंग व्यवस्थेमुळे पर्यटकांना किंमती मोटार गाड्या कुठेतरी घाटात पार्क करून पायपीट करावी लागते एकंदरीत त्यांना सुरक्षित प्रवासाची,वाहतूक व्यवस्थेची आवश्यकता निर्माण झाली आहे.यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेऊन अन्य ठिकाणांहून सहज उपलब्ध होणारे पर्यायी मार्ग तयार केल्याशिवाय गत्यंतर नाही. अशी मागणी स्थानिक भूमिपुत्रांमधून सातत्याने जोर धरू लागली आहे.

मागील काळात फिनिक्युलर रेल्वे सारख्या होऊ घातलेल्या महत्वाकांक्षी प्रकल्पाला तालुक्यातील जबाबदार लोकप्रतिनिधींनी केवळ मतांच्याच राजकारणापायी खोडा घालून विरोध केला होता. राज्य शासनाने सुंदर स्थळाचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी जोपर्यंत पर्यायी व्यवस्था निर्माण करत नाही तोपर्यंत हे स्थळ पूर्वापार चालत आलेल्या जोखडात संपुष्टात येण्याची शक्यता आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात माथेरानमध्ये स्थानिक पातळीवर सुध्दा विकासाला विरोध करणारी अशिक्षित मंडळी सुध्दा कार्यरत आहे.

सुट्ट्यांच्या हंगामात घाटरस्त्यात गाड्यांच्या रांगा लागत असून मुलांना सामानसोबत पायी आणणे म्हणजे एकप्रकारे इथे आल्याची शिक्षा पर्यटकांना सहन करावी लागल्याची विदारक दृश्ये याठिकाणी पहावयास मिळतात. त्यामुळेच तालुक्यातील लोकप्रतिनिधी यापुढेही पर्यायी मार्गास मतांच्या राजकारणापायी अप्रत्यक्षपणे हमखास विरोध करणार यात शंकाच नाही. त्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेऊन इथे पर्यायी व्यवस्था निर्माण करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे सहसंचालक डॉ. अ. म. जाधव व प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक गावित यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विभागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांसाठी शिकाऊ उमेदवारी भरती मुलाखती व कॅम्पस मुलाखती सध्या मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहे.

याचाच एक भाग म्हणून बीटीआरआय महाड व नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्या संकुलातील शेठ ओ. एस. परमार डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग यांच्या वतीने भव्य कॅम्पस मुलाखतीचे आयोजन शेठ ओ. एस. परमार इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये करण्यात आले आहे.

बोईसर येथील कॅलेक्स केमिकल अँड फर्टीलायझर लिमिटेड त्यांच्या मार्फत या कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात

# प्राण्यांच्या उपचारासाठीही एक्स-रे मशीन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आजारपण किंवा अपघातात उपचारासाठी माणसाप्रमाणेच गायी, म्हैस व तत्सम पाळीव प्राण्यांचे एक्स रे काढण्यासाठी अत्याधुनिक पद्धतीचीमशीनतयारकरण्यातआली आहे. ही सुविधा अलिबाग येथील जिल्हा पशु वैद्यकीय रुग्णालयात सुरू झाली असून या सुविधेमुळे जिल्ह्यातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या एक्स-रे सुविधेने अपघातग्रस्त प्राण्यांच्या फॅक्चरवर खात्रीशीर उपचार करता येणार आहेत जनावरांना होणाऱ्या त्रासाची कल्पना अनेकदा त्यांच्या मालकासह उपचार करणाऱ्या डॉक्टरांनाही येत नाही. त्यांच्या दररोजच्या हालचाली, वागण्यात, आवाजात होणाऱ्या बदलाने पाळीव प्राणी आजारी आहेत, असा अनुमान काढला जातो. त्यामुळे त्या आजारी प्राण्यांवर खात्रीशीर उपाय करण्यास विलंब होतो. अनेकवेळा वेळेवर उपचार न मिळाल्याने ते पाळीव प्राणी मृत्युमुखी पडते.

घरातील मांजरापासून गायी-म्हशींवरही या एक्स-रे सुविधेमुळे अचूक निदान होऊन डॉक्टरांना खात्रीशीर उपचार करता येणार आहेत. अनेकदा वाहनाच्या धडकेमुळे जनावरे अपघातग्रस्त होतात. त्यांना मुका मार लागतो किंवा हाड तुटण्याचे प्रकार घडतात. फॅक्चर नक्की कुठे झाले याचे निदान करणे डॉक्टरांना अवघड जाते. यातून दुखापतीचे गांभीर्यही समजून येत नाही. अशा जनावरांना रुग्णालयात आणल्यानंतर त्यांच्यावर योग्य उपचार व्हावेत. त्यांच्या दुखापतीचे योग्य निदान व्हावे यासाठी जिल्हा पशू वैद्यकीय दवाखान्यात बसवलेल्या एक्स-रे मशिनद्वारे मोठ्या जनावरांनाही आडवे करू एक्स-रे काढता येणार आहेत.

यासाठी ९० अंशामध्ये दिशा बदलणारे स्ट्रेचर बसवले आहे. या स्ट्रेचरवर जनावराला बांधल्यानंतर दुखापतग्रस्त अवयवाचे एक्स-रे शॉट घेतल्यानंतर त्याची संगणकावर डिजिटल प्रतिमा तयार होते.

> जनावरांच्या संदर्भात नागरिक अधिक सजग झाले आहेत. पाळीव जनावरांबरोबच दूध देणारी, शेती कामासाठी मदत करणाऱ्या जनावरांवर खात्रीशीर उपचार व्हावेत अशी अपेक्षा असते. पशुंना कोणता आजार झाला आहे, याचे निदान एक्स-रे शिवाय करणे कठीण असते. सुविधा जिल्हा पशू वैद्यकीय दवाखान्यात झाल्याने पशुपालकांना दिलासा आहे.
> - डॉ. सचिन देशपांडे, उपआयुक्त, जिल्हा पशुसंवर्धन, रायगड.

# घराजवळच होणार कर्करोगाची चाचणी

## उपकरणांसाठी अर्थसंकल्पात ७८ कोटी रुपयांची तरतूद

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**राज्य सरकारने सादर केलेल्या २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या अतिरिक्त बजेटमध्ये राज्यातील सर्व आरोग्य उपकेंद्रांमध्ये स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोग तपासणीसाठी उपकरणे उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. यासाठी ७८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

देशात स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाची प्रकरणे झपाट्याने वाढत आहेत. भारतात स्तनाच्या कर्करोगानंतर महिलांमध्ये आढळणारा हा दुसरा सर्वात सामान्य कर्करोग आहे. वेळेवर निदान केल्यास ९८ टक्के प्रकरणांमध्ये जीव वाचू शकतो. या दिशेने पावले उचलत राज्य सरकारने या दोन्ही कर्करोगांचे स्क्रीनिंग लोकांना त्यांच्या घराजवळ उपलब्ध करून देण्यासाठी पावले उचलली आहेत.

आरोग्याच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्पामध्ये स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाच्या तपासणीवर भर देण्यात आला आहे. राज्यातील आरोग्य उपकेंद्रांमध्ये स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोग तपासणीसाठी उपकरणे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### रुग्णालये जनस्वास्थ्य योजनेशी जोडणार

**राज्यातील एकही नागरिक उपचारांपासून वंचित राहू नये, यासाठी राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जनस्वास्थ्य योजना सुरू करण्यात आली आहे. नुकताच राज्य सरकारने या योजनेचा आरोग्य विमा निधी दीड लाखांवरून पाच लाख रुपयांपर्यंत वाढवला आहे. आतापर्यंत एक हजार रुग्णालये या योजनेशी जोडण्यात आली होती. अधिकाधिक लोकांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी सरकारने या योजनेत आणखी ९०० रुग्णालये जोडली आहेत. यासोबतच या योजनेंतर्गत १,३५६ आजारांवर उपचारांचाही अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला आहे.**

### नवीन रुग्णवाहिका

**राज्यात रुग्णांना, विशेषत: गरोदर महिला आणि बालकांना घर ते रुग्णालयात आणि रुग्णालयातून घरापर्यंत नेण्यासाठी तीन हजार ३२४ रुग्णवाहिकांची सेवा मोफत दिली जाते. यातील बहुतांश रुग्णवाहिका जुन्या असून त्या बदलून नवीन रुग्णवाहिका देण्याची घोषणा केली आहे.**

# मुसळधार पावसाचा इशारा

## रायगडला दिला ऑरेंज अलर्ट

## नागरिकांनी सतर्कत राहावे

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात जोरदार पावसाला सुरुवात झाली असून नद्या, तलाव, विहिरींची पातळी वाढली आहे. ठिकठिकाणी सखल भागातही पाणी साचल्याने नागरिकांची गैरसोय झाली. हवामान विभागाने दोन जुलैपर्यंत ऑरेंज अलर्ट जारी केला असून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

अलिबागसह रोहा, माणगाव, पनवेल, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यांमध्ये ४८९ मिमीपासून ५५१ मिमी तर कर्जत, उरण, खालापूर, पेण या तालुक्यांमध्ये २१४.३ मिम ीपासून ३८३.८ मिमीपर्यंत पावसाची नोंद झाली आहे.हवामान विभागाने २ जुलैपर्यंत ऑरेंज अलर्ट दिला आहे. या कालावधीत विनाकारण घरातून बाहेर पडू नये, विजेच्या अथवा झाडाच्या बाजूला थांबू नये. सखल भागात साचलेल्या पाण्याचा अंदाज घेऊनच वाहन चालवावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### ९८ हजार हेक्टरवर भातलागवड

**भाताची रोपे लावणी योग्य झाली होती, मात्र पावसाअभावी लावणीची कामे खोळंबली होती. अखेर पावसाची जोरदार बरसात सुरु झाल्याने शेतकरी सुखावला आहे. भातलावणीच्या कामांना सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात सुमारे ९८ हजार हेक्टर क्षेत्रात भातलागवड केली जाणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे.**

**निवडक**

## डॉक्टरांचा सन्मान

**माणगाव :** शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड.राजीव साबळे यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त व डॉक्टर्स डे या दिवसाचे औचित्य साधून सोमवारी (दि.१) तालुक्यातील डॉक्टरांचा संस्थेतर्फे द.ग.तटकरे महाविद्यलयात सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ.अभिजित मेहता, डॉ. आबासाहेब पाटणकर, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. संताजी यादव, डॉ. नितीश सावंत, डॉ. मोघल हसन, डॉ. सचिन मेहता, डॉ. आदेश घोणे, डॉ. सुनीता कोकणे, डॉ. क्षमा मेहता, डॉ. पूजा सावंत आदी डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.

## रसायनीत वृक्षारोपण कार्यक्रम

**रसायनी :** प्रसोल केमिकल्स कंपनी, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व ग्रुप ग्रामपंचायत गोरठण यांच्या संयुक्त विद्यमानाने विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी पाच हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करत वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही घेण्यात आली आहे. यावेळी रमेश पाटील, अरुण जाधव, सचिन वर्मा, भालचंद्र पाटील, शिल्पा झेमसे, प्रतीक्षा चव्हाण, एल.बी. पाटील, प्रतिमा खैरे, रोहित इंगळे, संदीप पाटील आदी उपस्थित होते.

## म्हसळ्यात कृषीदीन साजरा

**म्हसळा :** राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने महाराष्ट्र राज्यात कृषिदीन साजरा करण्यात येतो. या निमित्ताने म्हसळा पंचायत समिती आणि केशवराव खांबेटे सार्वजानिक वाचनालयात कृषि दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी महादेव पाटील, संजय खांबेटे, अशोक काते, पांडुरंग पाटील, उदय कळस, माधव जाधव, राजेंद्र ढंगारे, बबन कांबळे, अशोक बागकर, दामोदर दिघीकर, हेमंत माळी, चौधरी, सुजय कुसाळकर, अनिता दानवे, अस्लाम कौचाली आदी मान्यवर उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीचा मृत्यू

**माणगांव :** येथील आश्रमशाळेतील ६ वर्षीय मुलीचा आजरपणामुळे मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३० जून रोजी सकाळच्या सुमारास नेत्रा भरत लेंडी (६) रा. बोरावाडी-बेणसे ही दोन दिवसांपासून आजारी होती. तिला ताप व उलटी होत असल्याने उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे औषधोपचार चालू होते. ते चालू असताना तिचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद माणगांव पोलीस ठाणे येथे करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील करीत आहेत.

## नांदगावमध्ये वृक्षारोपण

**मुरूड-जंजिरा :** कृषी दिनाचे औचित्य साधून मुरुड तालुक्यातील यशवंतनगर येथील सी.एस.एन विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सी.एस.एन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ए.यु. खोत, पर्यवेक्षक पी. आर. पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, दत्तात्रय खुळपे, सागर राऊत, राहील घलटे, निशा बिरवाडकर व अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शालेय परिसरात वृक्षारोपण केले.

# शेतीच्या कामाला मजुरांची वानवा

## शासनाकडून उपाययोजना राबवण्याची मागणी

**। म्हसळा । वार्ताहर ।**

**तालुक्यात उशिरा पावसाच्या आगमनामुळे रोपांची वाढ आवश्यक त्या प्रमाणात न झाल्याने आणि त्यातच ८०% लोकांचे स्थलांतर झाल्याने तालुक्यात शेतीच्या कामाला मजुरांची कमतरता भासू लागली आहे.**



शासनाच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे शेतकऱ्यांना शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही. यामुळी स्थानिक शेतकऱ्याला शेती करण्यात काडीचाही रस राहिला नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. यामुळे येथील तरूण वर्ग कामासाठी शहराकडे वळत आहेत. नाहिलाजाने त्यांच्या मागोमाग कुंटुंबालाही राहते घर सोडून शहरात जावे लागत आहे. यातच आता रोपे लावणीस तयार झाली असून लावणीच्या कामाची प्रतीक्षा शेतकऱ्यांना लागली आहे. परंतु, एकाच वेळी सर्वत्र लावणी सुरु झाल्यामुळे तसेच स्थानिक लोकांच्या स्थलांतरामुळे शेत मजुरांचा तुटवडा जाणवू लागला आहे. त्यामुळे शेत मजुरांच्या मागणीत वाढ झाली असल्याने ते अवास्तव मजुरीची मागणी करतील याची चिंताही दिवसेंदिवस जाणवु लागली आहे.

पुर्वी शेतकरी मेहनत करून शेतीतून तीन-चार खंडी भात, पाच-दहा मण नाचणी, वरीची पिके घेऊन सुजलाम सुफलाम राहण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु, आता आषाढी एकादशीला उपवास सोडायला लागणारी वरीची भाकरी दिसेनाशी झाली आहे. याला महत्वाचे कारण म्हणजे केल्टी, माकडे आणि रानडुकरांचा वाढता उपद्रव कारणीभूत आहे. यासाठी वनविभाग हि तेवढेच जबादार असल्याचे बोलले जात आहे. शेती, पिके यांचे संरक्षण व्हावे या दृष्टीकोनातून एकही उपाययोजना वनविभागाकडून राबविली जात नाही. त्यात सरकारकडून मिळणारे आयते धान्य हेही महत्वाचे कारण असल्याचे बोलले जात आहे. यासाठी शेती केंद्रित योजना शासनाने राबविल्या पाहिजेत, जेणेकरून कमी कष्ट आणि उत्पन्न जास्त होऊन पूर्वीचे वैभव प्राप्त होईल.

> **भाताच्या पेरणीनंतर आता रोपांची वाढ लावणीलायक झाली आहे. पावसाभावी लावण्या लांबल्यास मजूर मिळणे कठीण होईल. मजुरीही वाढेल आणि त्यामुळे लावण्या अजुन लांबणीवर जाण्याची शक्यता आहे.**
>
> **- महादेव पाटील, शेतकरी.**

## शांताबाई बाकाडे यांचे निधन

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील पाले खुर्द येथील रहिवाशी शांताबाई गोविंद बाकाडे यांचे बुधवार दि.२६ जुन रोजी निधन झाले. मृत्यूसमयी शांताबाई बाकाडे यांचे वय ९५ वर्षाचे होते.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे व मोठा बाकाडे परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.५) तर उत्तरकार्य विधी रविवारी (दि.७) त्यांच्या पाले खुर्द येथील राहत्या घरी होणार असल्याचे बोकाडे परिवाराकडून सांगण्यात आले आहे.

# कोळसा ट्रान्सपोर्टचे काम प्रकल्पग्रस्तांना मिळावे

## अन्यथा धरणे आंदोलन

**। उरण । वार्ताहर ।**

करंजा बंदरातून कोळशाची वाहतूक होत आहे. तरी या वाहतुकीचे काम येथील स्थानिक भूमिपुत्रांना मिळावेत अशी मागणी उरण पनवेल विभाग लॉरी मालक सेवा संघाने लावून धरली होती. याबाबतचे निवेदन तहसीलदारांना देऊनही ते याकडे दुर्लक्ष करीत असल्याने धरणे आंदोलन करण्याचा इशारा सेवा सघांकडून देण्यात आला आहे.

उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने सिडकोने खरेदी केली आहे. त्यामुळे येथील शेतकरी भूमिहीन झाला असल्याने त्यांनी उपजीविकेसाठी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उरण-पनवेल विभाग लॉरी मालक सेवा संघ या संस्थेची स्थापना केली होती. मात्र, येथील करंजा टर्मिनल अँड लॉजिस्टिकमधून कोळशाची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे. तरी या ट्रान्सपोर्टचे काम हे येथील प्रकल्पग्रतांना मिळण्यासाठी संघाने सातत्याने पाठपुरावा करूनही याकडे प्रशासन जाणुनबुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप या संघ संस्थेकडून होत आहे. याबाबत तहसीलदारांना दि.७ जुन व २८ जुन रोजी पत्र देऊन या विषयांवर सकारात्मक चर्चा करून तोडगा काढण्याची मागणी संघाने केली होती. तरीही याबाबत कोणताच तोडगा अथवा चर्चा झाली नाही. त्याचा निषेध म्हणून धरणे आंदोलन सुरू करण्याचा इशारा प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# सीकेपीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी समीर गुप्ते



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू (सीकेपी) समाजाची राष्ट्रीय स्तरावर सर्वोच्च संस्था असलेल्या अखिल भारतीय चांद्रसेनीय कायस्थ प्रभू मध्यवर्ती संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत समिर गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली श्री एकविरा पॅनलचे सर्वच्या सर्व बारा उमेदवार प्रचंड मताधिक्याने निवडून आले. या निवडणुकीत ठाणे येथील समिर गुप्ते यांची संस्थेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. विश्वस्तपदी अरुणा कर्णिक, शिरीष चिटणीस, अशोक देशपांडे, संजय दिघे, नागेश कुळकर्णी यांची तर उपाध्यक्षपदी सुरभी गडकरी, मंदार कुळकर्णी, चंद्रशेखर देशपांडे तसेच कार्यकारी मंडळाच्या सदस्यपदी वर्षा दिघे, चंद्रशेखर बेंद्रे, श्रीकृष्ण चित्रे हे निवडून आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निनाद जयवंत व निलेश गुप्ते यांनी काम पाहिले. चांद्रसेनीय कायस्थ प्रभू (सीकेपी) समाज रायगड विभागीय समितीचे अध्यक्ष सुभाष राजे, उपाध्यक्ष राजन टिपणीस, प्रदिप श्रृंगारपुरे, कार्यवाह अशोक प्रधान, सहकार्यवाह नैनिता कर्णिक यांनी निवडून आलेल्या सर्वाचे अभिनंदन केले आहे.

## गोपाळ म्हसकर यांचे निधन

**। सुकेळी । वार्ताहर ।**

नागोठणे जवळ असलेल्या बाळसई गावातील गोपाळ दगडु म्हसकर यांचे रविवार दि.३० जुन रोजी निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ७८ वर्षे होते.



त्यांच्यावर सोमवारी (दि.१) सकाळी बाळसई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वारकरी सांप्रदायासह विविध क्षेत्रातील जनसमुदाय जमला होता. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, मुलगा, मुली, नातवंडे असा मोठा म्हसकर परिवार आहे. गोपाळ म्हसकर यांचे दशक्रिया विधी मंगळवारी (दि.९) तर उत्तरकार्य शुक्रवारी (दि.१२) बाळसई येथे होणार असल्याचे म्हसकर कुंटुबियांकडुन सांगण्यात आले आहे.

# कार्तिक जैन, मयुर जैन यांची निवड

**। नागोठणे । वार्ताहर ।**

महाराष्ट्रातील उद्योजक व्यापारी व सेवा पुरवणाऱ्या सर्व संघटनांची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड एग्रीकल्चरचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य म्हणून नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीचे सीईओ कार्तिक जैन व मयूर जैन यांची दोन वर्षांसाठी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र त्यांना नुकतेच मुंबई येथील कार्यक्रमात अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते देण्यात आले. यंदाच्या निवडणुकीत महाराष्ट्र चेंबरचे विद्यमान अध्यक्ष ललित गांधी यांची अध्यक्षपदी बिनविरोध फेर निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र चेंबर हे शासन दरबारी उद्योजकांच्या विविध समस्या मांडणे, उद्योजकांसाठी आणि व्यापाऱ्यांसाठी विविध संकल्पना राबविणे, नवनवीन उद्योग निर्मिती प्रक्रियेत सहभाग घेणे यासाठी कार्यरत आहे. यावेळी कृषी व व्यापार क्षेत्राला चालना देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चरच्या माध्यमातून आम्ही विशेष प्रयत्न करणार असल्याचे कार्तिक जैन यांनी सांगितले.





# अमली पदार्थांविरोधात कारवाईची मागणी



**। पनवेल । वार्ताहर ।**

युवासेना उत्तर रायगड, पनवेल आणि उरण विधानसभा पदाधिकाऱ्यांकडून पनवेल पोलिस उप आयुक्तांना ड्रग्ज आणि नशायुक्त अमलीपदार्थ विरोधात कठोर कारवाई करण्याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

पनवेल, खारघर, उरण आणि रायगड जिल्ह्यालगत असणाऱ्या शहरी आणि ग्रामीण भागात सर्रास विकल्या जाणाऱ्या गांजा, चरस, एमडी तसेच इतर अंमली पदार्थांसंदर्भात युवासेना उत्तर रायगड पनवेल विधानसभा तसेच उरण विधानसभा पदाधिकाऱ्यांकडून पनवेल पोलिस उपायुक्त विवेक पानसरे यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी अवैध रित्या गांजा आणि नशेचे पदार्थ विकणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, अवैध नशेचे पदार्थ विकणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन पोलिस उपायुक्त यांनी दिले आहेत. यावेळी रुपेश पाटील, रामदास शेवाळे तसेच युवासेना पनवेल आणि उरण विधानसभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# भात लावणीच्या कामाला प्रारंभ

**। खांब । वार्ताहर ।**

गेल्या आठ दिवसांपासून रोहा तालुक्यात भात लागवडीसाठी योग्य प्रमाणात पाऊस पडत असल्याने तालुक्यातील ग्रामीण भागात भात लावणीच्या कामाला प्रारंभ झाला असल्याचे पहावयला मिळत आहे.



या वर्षीच्या पावसाळी हंगामात चांगल्या पद्धतीने पावसाने सुरूवात केली असल्याने भात पेरणीची कामेही योग्य कालावधीत पुर्ण करण्यात आली आहेत. तर, पुढील कालावधीत देखील भाताचे राब रूजण्यास वेळोवेळी पुरेसा पाऊस झाल्याने भाताची रोपेही चांगल्या पद्धतीने रूजल्याने शेतकरी वर्गाच्या चेहऱ्यावरही समाधान दिसून येत आहे. दरम्यान, आठ दिवसांपासून पडत असलेल्या दमदार पावसामुळे भात लागवडीसाठी रोपांची योग्य वाढ झाल्याने अखेर शेतकरी वर्गाने जूलै महिन्याच्या पहिल्या आठवड्याचा मुहूर्त साधून आपल्या भात पेरणीच्या कामाला सुरुवात केली आहे.

## विजय साखरले सेवानिवृत्त

**। कोलाड । वार्ताहर ।**

द.ग. तटकरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कोलाड येथील मुख्य लेखनिक विजय नाना साखरले हे २६ वर्षाच्या दिर्घ कालावधीनंतर रविवारी (दि.३०) सेवानिवृत्त झाले. यावेळी रविंद्र लिमये, रविकांत घोसाळकर, प्रकाश कारखानीस, शिल्पा लिमये, सुनिल राऊत, सुलतान बेनसेकर, सुनिल भालेराव, महंमदआली धनशे, शिरीष येरुणकर, तिरमले, श्रीरंग काळेसर, विजय महाडिक, थोरात, उदय घोसाळकर, शरद चव्हाण, अविनाश माळी, उमेश साखरले, अरुण साखरले, डी.आर. पाटील तसेच सर्व उपस्थितांनी विजय साखरले यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शेकडो कामगारांना कामावरून केले कमी

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या तळा फॉरेस्ट हिल्स रिसॉर्टमधील शेकडो कामगारांना अचानक कामावरून कमी करण्यात आले आहे. यामुळे येथील कामगार बेरोजगार होऊन त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.



तालुक्यातील बोरभाटला येथे उभारण्यात आलेल्या तळा फॉरेस्ट हिल्स रिसॉर्टमध्ये गेल्या तेरा वर्षांपासून कामगार काम करीत आहेत. या ठिकाणी मराठी व हिंदी सिनेअभिनेते भेट देत असल्याने अल्पावधीतच या रिसॉर्टची ख्याती सर्वदूर पसरली आहे. परंतु, व्यवसाय चालू झाल्यापासून कामगारांना वेळोवेळी न सांगता अनिश्चित कालावधीसाठी ब्रेक देणे, कामगारांना बोनस न देणे, स्थानिकांना डावलून बाहेरील लोकांना कामावर घेणे, कामगारांना पीएफ न देणे, कोणालाही कायम न करणे, वाढीव पगार न देणे अश्या अनेक गोष्टी घडत होत्या. यातच रिसॉर्ट प्रशासनाकडून जवळपास शंभरहून अधिक स्थानिक कामगारांना अचानकपणे कामावरून काढून टाकण्यात आल्याने येथील कामगार आक्रमक झाले आहेत.

यावेळी या कामगारांनी स्थानीक नेत्याची भेट घेत सविस्तर प्रकार संगीतला असता त्यांनी फॉरेस्ट हिल्स रिसॉर्टचे मालक विरेश छाबरा व संबंधित इतर मान्यवरांशी कामगारांसह बैठक घेतली. परंतु, कंपनीचे मालक कामगारांना परत कामावर घेण्यास तयार नसून इतर कोणतीही मागणी मान्य करण्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले नाही. यामुळे सर्वच्या सर्व कामगारांना कामावर घेणार नसाल तर आम्ही देखील इतर कोणतीही चर्चा करणार नाही, असा पवित्रा घेत वेळप्रसंगी कामगारांच्या हक्कासाठी कायदा हातात घेऊ पण कामगारांना न्याय देऊन त्यांचा पोटापाण्याचा प्रश्न सोडवू, असा सज्जड दम स्थानीक नेत्याकडून रिसोर्ट व्यवस्थापनाला देण्यात आला आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३ अलिबाग
- मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर पाहिजे आहे. मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९८२२९३८४४४
- अलिबाग शहरात मध्यवर्ती ठिकाणी मेडिकलसाठी ४ ते ५ वर्षे अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे. ९४२११६३१२४
- Require Fresher/Experienced Civli engineers for Alibaug Project. Email CV to projects@parthinfraalibaug.com 9922768626 https://parthinfraalibaug.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## विद्यार्थ्यांनी साजरा केला वृक्षांचा वाढदिवस

# रायगड वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन

**। पाली-बेणसे । वार्ताहर ।**

**जिल्हा परिषद शाळा नेणवली येथे सोमवारी (दि.१) कृषिदिनाचे औचित्य साधून गटशिक्षणाधिकारी बांगारे व केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

या वृक्षारोपणसाठी स्वरदिव्य वेलफेअर फॉउंडेशन रायगड व ग्रीनटच नर्सरीच्या मार्फत शेवगा, कडुलिंब, कांचन, कढीपत्ता, चाफा, सोनचाफा, आवळा, बेल अशी उपयुक्त रोपे उपलब्ध करून देण्यात आली होती.

यावेळी सर्वप्रथम वृक्षारोपण प्रतिज्ञा घेण्यात आली. तद्नंतर वृक्षदिंडी काढून झाडे आणण्यात आली. तसेच, यावेळी 'झाडे लावा, झाडे जगवा' अशा घोषणा मुलांनी दिल्या. शाळेतील मुलांनी सुद्धा 'एक विद्यार्थी एक झाड' उपक्रमांतर्गत काही झाडे आणली होती. यावेळी शाळा



व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोहर कोंडे, सर्व सदस्य, मुख्याध्यापक राजेंद्र अंबीके, रवींद्र हंबीर, गणपत वरगडे व सर्व विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात रोप लागवड केली. तसेच, नेणवली शाळेतील विद्यार्थी कृषिदिनाचे औचित्य साधून दरवर्षी वृक्ष वाढदिवस आवडीने साजरा करीत असतात. यावेळी विद्यार्थ्यांनी यापूर्वी लावलेल्या वृक्षांचे औक्षण करून झाडाला फेर धरून वाढदिवस गीत गात चॉकलेट वाटून अनोखा वाढदिवस साजरा करून पर्यावरण व वृक्षप्रति आपल्या भावना जोपासल्या. तसेच, मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी आजच्या दिनाचे महत्व व वृक्षनिगा, जोपासना याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

> **आज आम्ही वृक्ष तर लावलेच पण त्यांचा वाढदिवस साजरा करताना खूप मज्जा आली. आम्ही चॉकलेट व केक सुद्धा वाटले.**
>
> **- श्रेया मगर, विद्यार्थीनी, नेणवली**

> **रिमझिम पावसात मुलांच्या सोबत वृक्षारोपण कार्यक्रम व पर्यावरण संवर्धनाचा वसा खुपच आल्हाददायक वाटला.**
>
> **- राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक**

# ग्रामविकास अधिकारी रविंद्र म्हात्रे सेवानिवृत्त

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील कोप्रोली गावचे रहिवासी श्री रवींद्र मधुसूदन म्हात्रे हे ग्राम विकास अधिकारी म्हणून ३४ वर्षाच्या शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांचा सेवानिवृत्ती सोहळा रविवार दिनांक ३० जून २०२४ रोजी कोप्रोली येथे मा.आ. मनोहर भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

यावेळी मा. आ. मनोहर भोईर हे त्यांना शुभेच्छा देताना म्हणाले की, रवी म्हात्रे यांनी ग्रामविकास अधिकारी म्हणून ३४ वर्ष अतिशय प्रामाणिकपणे सेवा करून ग्रामीण भागातील गावांच्या विकासामध्ये मोठे योगदान दिले आहे, आज ते शासकीय सेवेतून निवृत्त होत आहेत त्यांना माझ्याकडून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो तसेच ते एक निष्ठावंत शिवसैनिक आहे त्यांनी आता शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या राजकारणात सक्रिय होऊन एक मोठी जबाबदारी स्वीकारावी अशी त्यांना विनंती केली, यावेळी मा आ. मनोहर भोईर यांच्याहस्ते निवृत्त ग्रामविकास अधिकारी रवींद्र म्हात्रे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग**
**दागिने-नविन डिझाइन्स**

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळः विभागीय अभियंता (विद्युत), मुंबई प्रदेश**
**किरोल रोड : विद्याविहार (पश्चिम) : मुंबई–४०० ०८६**
Email. deelectmbi@gmail.com Phone ०२२-२५१३६३०३

**निविदा सुचना क्रमांक ०३ सन २०२४–२५**

विभागीय अभियंता (विद्युत), रा.प.मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार (प) मुंबई–८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत परंतु अनुभवी ठेकेदारांकडून मोहोरबंद निविदा मागवित आहेत. निविदा संच खरेदी करतेवेळी आयकर प्रमाणपत्र, जीएसटी, सॉल्व्हंसी, नोंदणी प्रमाणपत्र, भागीदारी संदर्भात कागदपत्रे, गेल्या तीन वर्षामध्ये केलेल्या कामाच्या अनुभवाचे दाखले व मशीनरी बाबतचे दाखले इत्यादी कागदपत्रांच्या छायांकीत व मूळ प्रती सादर करणे आवश्यक आहे.

(अ) कामाचे नांव :– पालघर विभागातील विभागीय कार्यशाळा पालघर येथे विद्युत दुरुस्ती करणे. (स्विचगेअर व पॅनलचे काम), पालघर विभागातील विभागीय भांडार शाखा येथे विद्युत दुरुस्ती व फेरफार करणे., पालघर विभागातील वसई बसस्थानकामध्ये विद्युत दुरुस्ती नुतनीकरण व फेरफार करणे., रायगड विभागातील विभागीय कार्यशाळा रामवाडी येथे विद्युत दुरुस्ती व फेरफार करणे., रायगड विभागातील पेण बसस्थानकातील शेड मध्ये विद्युतीकरण करणे., रायगड विभागातील रामवाडी येथे नुतनीकरण केलेल्या ट्रेनिंग सेंटरचे विद्युतीकरण करणे. (ब) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी (सुट्टीचे दिवस, दुसरा व चौथा शनिवार वगळून दुपारी १४.३० वाजेपर्यंत व शनिवारी ११.०० वाजेपर्यंत) दिनांक ०१.०७.२०२४ ते ०८.०७.२०२४.

(क) निविदेच्या शर्ती, नकाशे कामाच्या खुलासेवार सूचना इत्यादी कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील

विभागीय अभियंता (विद्युत)
रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)

**अलिबाग को-ऑप. अर्बन बँक लि.,**
**शुद्धीपत्रक**

अलिबाग को-ऑप अर्बन बँक लि., अलिबाग बँकेचा दि. २७ जून २०२४ रोजीच्या दैनिक कृषीवल वर्तमान पत्रामध्ये पान क्र. ७ व छपाई केलेला Independent Auditor's Report मधील Basic of Opinion मुद्दा क्र. २ नजरचुकीने छपाई झाला आहे, तो रद्द समजावा.

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
अलिबाग को-ऑप अर्बन बँक लि.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्धारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून आमचे अशिल श्री. विपुल गोपालदास शेठिया यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या शेती/राबपड जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. प्रति | आकार |
|---|---|---|---|
| श्री. प्रसाद चांगदेव कातकडे | १०/२/ब | एकुण:-०-१९-५० | ०.१२ |
| श्री. प्रसाद चांगदेव कातकडे | १०/४/ब | एकुण :-०-२१-५० | ०.१७ |
| श्री. प्रसाद चांगदेव कातकडे | १२/१ | एकुण :-०-१६-०० | ०.९५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : लक्ष्मी अपार्टमेंट, सदनिका क्रं. १०८ पहिला मजला, शेलु स्टेशन जवळ (पु), बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण : कर्जत

सही
**ॲड. सूर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक : ०२/०७/२०२४
मो.नं. ९९२२१५५१५३

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : - ९७/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. रुकैया उस्मान जलगावकर
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. रुकैया फैयाज गालसूलकर
लग्नानंतरचे नाव ... अर्जदार
वय ५२ वर्षे, धंदा : शेती.
रा. मु. पो. दहिवली,
ता. माणगांव, जि. रायगड
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी.
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. ... सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. रुकैया उस्मान जलगावकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम रुकैया फैयाज गालसूलकर - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे दि. २९/०५/१९७२ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. १३/०५/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २९/०५/१९७२ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. रूकैया उस्मान जलगावकर- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम रूकैया फैयाज गालसूलकर - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २९/०५/१९७२ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. ०१/०७/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

आरटीएस अपिल क्र. ०४/२०२२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
१. जयराम कान्हु ठाकरे,
रा. सावरगांव, ता. कर्जत, जि. रायगड ... अपिलार्थी
विरुध्द
१. मारुती परशुराम बैलमारे,
रा. मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड
२. कलाबाई शिवाजी पाटील,
रा. फ्लॅट नं. २४ व २५, श्री. गणपती को. ऑप. हौ.सो.,
गणेश नगर चांभार्ली, मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड
३. विशाल गोपाळ पाटील,
रा. श्रीसाफल्य बंगलो, नानामास्तर नगर, मुद्रे खुर्द,
ता. कर्जत, जि. रायगड
४. प्रतिक बळीराम बैलमारे,
५. शेखर रामचंद्र बैलमारे,
अ.क्र. ४ व ५ रा. मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड
६. कांचन शिवाजी पाटील,
रा. प्लॉट नं. ८६/३१४ आश्रय को. ऑप. हौ.सो.,
लोखंडी पाडा, परदेशी आळी, पनवेल, ता.पनवेल, जि. रायगड ...सामनेवाला

वादी यांनी मौजे सावरगांव, ता. कर्जत, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक २७१ चे विरूध्द दि. १९/०५/२०२३ रोजी या कार्यालयात अपील दाखल केले आहे. प्रकरणी या न्यायालयाकडील दि.१८/०१/२०२४ रोजीच्या आदेशान्वये वि.मा.अर्ज क्र.३६/२०२३ मान्य करुन अपिल दाखल करुन घेण्यात आलेले आहे.

सदर अपिलाचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि.२७/०६/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १९/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, प्रशासकीय भवन, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

प्रस्तुत अर्जामधील सर्व सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | स. नं/हि. नं | क्षेत्र चौ.मी | आकार |
|---|---|---|---|
| १ | २६/० | ०-३२-४० | ५-०६ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
ठिकाण : कर्जत
दिनांक : २८/०६/२०२४

सही/-
**उपविभागीय अधिकारी**
कर्जत उपविभाग कर्जत करिता

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक ज्ञानेश्वर धोंडू तुपे व बाळु काळू आखाडे यांचेकडून खरेत्री करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे पोटल, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर-पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६०/५ | एकुण ०-१५-०० हे आर पॉ | १-४४ |
| ६०/६ | एकुण ०-३०-०० हे आर पॉ | ३-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमात्रा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेद्री-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०२/०७/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : - ९८/२०२८

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. महमद अली अबुबकर लोखंडे
वय ४१ वर्षे, धंदा : शेती. ... अर्जदार
रा. मु. पो. निजामपूर,
ता. माणगांव, जि. रायगड
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर,
ता. माणगांव, जि. रायगड. ... सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. महमद अली अबुबकर लोखंडे यांचा जन्म मौजे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २१/१०/१९८३ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्म ाची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. १२२/२०२४ ने दि. ०३/०६/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २१/१०/१९८३ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी. विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. महमद अली अबुबकर लोखंडे यांचा जन्म मौजे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २१/१०/१९८३ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. ०१/०७ /२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे - बेलोशी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील श्री. जनार्दन बाळाराम वालेकर, रा. बेलोशी यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

१) मौजे: बेलोशी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक ३७७, क्षेत्र : ०-१२- ७० हे.आर,+ पो.ख. ०-०१-०० हे. आर, एकूण क्षेत्र ०-१३-७० हे. आर, आकार रु. २.५६ पैसे.

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ०१/०७/२०२४

सही/-
**ॲड. समाधान रविंद्र पाटील**
मु.पो. वेश्वी, हनुमान मंदिर जवळ,
ता. अलिबाग, रा. रायगड
मोबा. नं. ८९८३०११९६९

## जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे मोठे वेणगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मोठे वेणगांव, ता. कर्जत, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मोठे वेणगांव | ८९ | २/क | ०-२८-०० | ५.०६ |

वर वर्णन केलेल्या मिळकती श्री. जगन जनार्दन शेळके यांचे ताबेकब्जातील व वहिवाटीखालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करावयाचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :
दिनांक : / /२०२४

**ॲड. पराग मनोहर सावंत**
रा. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१.
मो.नं. ९८३३४४५५३३

## PUBLICE NOTICE

We are investigating the title of Mr.Rajesh Lachmandas Kaura, Resident Of N.C.P.A. Apartments, 17th Floor Flat No. 1, Nariman Point, Mumbai - 400021, who have represented that he is the sole owner and possessors and is absolutely entitled to and free from all encumbrances, the land along with house therein situated at Village Boris, Taluka - Alibag, District - Raigad as mentioned in the Schedule herein below -

Any person/persons/body of persons/company/LLP/Partnership/Firm/ Bank/Firm/Financial Corporation/Non Banking Financial Corporation/ Credit Society having any claim or interest in or to the said lands or any part thereof by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust. Inheritance, tenancy, possession, lease, sub-lease, license, lien, easement, occupancy right or otherwise are hereby required to make the same known in writing to our office at the address given below within 14 days from the date her of, otherwise it shall be presumed and accepted that there does not exist nay such claim or interest and the same will be considered as waived. The objections or claims received after due date shall not be entertained.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**

A) ALL THAT pieces or parcels of agricultural land or ground situated at Village Boris, Talika - Alibag, District - Raigad:-

| Block/Hissa Number | Area H.R. Sq.Mtrs. | Assessment Rs. Ps. |
|---|---|---|
| 62/3/B | 0.69.0 | 03.99 |
| | Paiki (Part) 0.53.0 | 03.21 |

Along with Grampanchayat Boris House No. 79 B, 139 & 141 and bounded as - Towards East: Land Gat No. 62, Hissa No. 3/3 of Village Boris, Towards West: Village Road, Towards North: Kihim - Boris Village Road, Towards South: Land Gat No. 62, Hissa No. 3/3 Village Boris.

Alibag
Date 01.07.2024

sd/-
**(Adv.S.Y.Bartake)**

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बागदांडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकत श्री. रमाकांत पांडुरंग पाटील, राहणार बी/१०३, सनराईस अपार्टमेंट, नेहरू रोड, वाकोला, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०५५ यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. रमाकांत पांडुरंग पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बागदांडा, ता.अलिबाग. | २५ | ०-३२-१० <br> ०-००-५० पो.ख. <br> ०-३२-६० एकूण | ४-५६ |

अलिबाग,
दिनांक : ०१/०७/२०२४

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री गिरिजा शंकर गौरी शंकर गुप्ता व सौ. रेखा गिरीजा शंकर गुप्ता यांचेकडून रस्ता वहिवाटीचे कराराने घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २४ | ३ क | ०-३२-०० पैकी ०-०६-० | ०-५८ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. ०२/०७/२०२४.

**ॲड.सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे वरई तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या बिनशेती जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) दत्तात्रय आत्माराम अदाते २) हितेश पांडुरंग चव्हाण यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे सदर बिनशेती जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वरई तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४५ | ३ | १०-५०-०० | १०५-०० |
| ४५ | ५/अ | १७-१०-०० | १७१-०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०२/०७/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेत जमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कबजा, मालकी वहीवाटीतील आहे. त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खलीलप्रमाणे

**मौजे मालाठे ता तळा जि रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | क्षेत्र हे आर | आकार रू पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| प्रकाश दत्तु ठमके व इतर आठ | ४१३ | जि ०-६४-०० <br> पोख ०-१५-०० <br> ०-७९-०० | ०.२५ | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे अशिल विरेंन भानजी गाडा यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कबजा, वहीवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझेशन, भागीदारी, बक्षीस, कुळ वहिवाट, पोटगी अथवा मिळकतीबाबत वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसात लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक रहाणार नाही. हे कळावे.

दि ०२/०७/२०२४

सही/-
**ॲड. श्री पी. जी. दाभाडे**
रा प्लॅट नं ४०२ बी विंग चौथा मजला साई नगरी
सोसायटी छत्रपती शिवाजी नगर वागळे हॉस्पीटल जवळ
रोहा ता रोहा जि रायगड
मो नं. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. शिवकुमार एकनाथ पाटील, रा.मु. बागदांडा, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या ताबेकब्जे वहिवाटीत व कसवणूकीत खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| बागदांडा (जुना मिळकतखार) ता. अलिबाग जि. रायगड | १ | २ | १-४६-६० <br> ०-२१-८० <br> १-६८-४० | ४५.०६ |

सदरहू मिळकतीपैकी १-४२-६० हे.आर.पैकी ०-२०-०० हे.आर. इतक्या क्षेत्राची मिळकत व त्यामध्ये असलेले घर हे सदरहू नोटीसीचा विषय आहे.

सदरहू मिळकतीच्या चर्तुःसिमा खालीलप्रमाणे.
पूर्वेस : बागदांडा ग्रामस्थांचा विहिरीवर जाण्याचा रस्ता.
पश्चिमेस : बागदांडा ग्रामस्थांचा रस्ता व दगडी बंधारा
दक्षिणेस : श्री. नकुल तोष्णीवाल यांची मिळकत व सार्वजनिक विहीर
उत्तरेस : बागदांडा ग्रामस्थांचा रस्ता.

सदरहू मिळकतीसंदर्भात आमच्या अशिलांनी १) श्री. फ्रँक ऑटोनियो डिसोजा उर्फ फरँक अँटोनियो डिसोझा २) सौ. दिपीका दिपक मढवी ३) श्री. नकुल तोष्णीवाल यांच्याविरुद्ध अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर मुकदमा नं. १०/२०२४ ने ठरावाकरीता, निरंतर ताकिदीच्या मनाई हुकुमाकरीता व इतर मागण्यांकरीता दावा दाखल केलेला आहे.

आमच्या अशिलांनी दिलेल्या माहितीवरून व त्यांच्या सांगण्यावरून या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतींसंबंधी कुणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा, हस्तांतरणाचा व्यवहार करू नये तसेच मिळकतीसुद्धा विकसित करू नये व मिळकतींमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये. सदरहू व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २९/०६/२०२४

**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला
हिराबाग को.ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

निवडक

### संसदेत संघाचे अभिनंदन

**नवी दिल्ली :** रोहित शर्माच्या नेतृत्वातील टीम इंडियाने यंदाचा विश्वचषक जिंकला. या विजयानंतर सर्वत्र जल्लोष साजरा केला जात आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय संघाने प्रथमच ट्वेंटी-२० विश्वचषकाचा किताब जिंकला. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी टीम इंडियाचे अभिनंदन केले. भारतीय संघाच्या विजयानंतर ओम बिर्ला यांच्यासह संपूर्ण सभागृहाने भारतीय संघाचे अभिनंदन केले. या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण देशात उत्साह संचारल्याचे ते म्हणाले.

### २०२४ मधील सर्वोत्तम संघ

**मुंबई :** ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ मधील सर्वोत्तम संघ आयसीसीने जाहीर केला आहे. भारतातील संघातील सहा खेळाडूंचा समावेश आहे. रोहित शर्मा, अफगाणिस्तानचा रहमानुल्लाह गुरबाज, वेस्ट इंडिजचा निकोलस पूरन, भारताचा सूर्यकुमार यादव, ऑस्ट्रेलियाचा मार्कस स्टॉयनिस, हार्दिक पांड्या आणि अक्षर पटेल, अफगाणिस्तानचा कर्णधार राशिद खान, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, फझलहक फारूकी यांना संधी मिळाली आहे.

### आनंद महिंद्रांची पोस्ट चर्चेत

**मुंबई :** हार्दिकने शेवटच्या ओव्हरमध्ये टिच्चून गोलंदाजी करत भारतीय संघाला विजय मिळवून दिला. मैदानातच त्याला अश्रु अनावर झाले. त्याचा हाच रडतानाचा फोटो आनंद महिंद्रा यांनी आपल्या ट्विटरवर पोस्ट केला आहे. काही दिवसांपूर्वी त्याला मैदानावर चिडवले जात होते. त्याचा हा खरा चेहरा आहे. त्याचा चेहरा हेच शिकवतो की, जीवनात कोणीही तुम्हाला थप्पड मारली आणि खाली पाडले तर तुम्ही पुन्हा उभे राहू शकता, पुन्हा हिरो बनू शकता.

### आयुष्यमानची कविता

**मुंबई :** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील टी-२० क्रिकेट विश्वचषक सामना भारताने जिंकला. विश्वविजेत्या टीम इंडियावर सर्वच स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. बॉलिवूड अभिनेता आयुष्मान खुरानाने टीमला खास शुभेच्छा दिल्या आहेत. त्याने एक खास कविता लिहिली आहे. त्याची हि कविता समाज माध्यमावर व्हायरल झाली आहे. भारताने टी-२० वर्ल्ड कप जिंकल्याने आयुष्यमानने आनंद व्यक्त केला आहे. आयुष्मानच्या या कवितेचे चाहत्यांकडून कौतुक करण्यात येत आहे.

### चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५

**मुंबई :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ फेब्रुवारीत आयोजित केली जाणार आहे. ती वन डे फॉरमॅटमध्ये असेल. टीम इंडियाचे पुढील लक्ष्य हे आयसीसीचे जेतेपद आहे. यामध्ये विराट आणि रोहितही खेळणार आहेत. पीटीआयच्या एका बातमीनुसार, जय शाह म्हणाले की, टीम इंडियाने सर्व विजेतेपदे जिंकावीत अशी माझी इच्छा आहे. आमच्याकडे सर्वात मोठी बेंच स्ट्रेंथ आहे. आमचे पुढील लक्ष्य जागतिक कसोटी चॅम्पियनशिप आणि चॅम्पियन्स ट्रॉफी आहे.

## भारतीय महिला संघाने
# दक्षिण आफ्रिकेला धूळ चारली



**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी सामना आज पार पडला. चार दिवस चाललेल्या या सामन्यात टीम इंडियाने १० गडी राखून विजय मिळवला. टीम इंडियाला दुसऱ्या डावात फक्त ३७ धावांची गरज होती, जी त्याने एकही विकेट न गमावता पूर्ण केली. भारताने हे लक्ष्य १० व्या षटकातच गाठले आणि मालिका जिंकली. या सामन्यात भारतीय महिला संघाच्या फलंदाजांनी चमकदार कामगिरी केली असली तरी गोलंदाज स्नेह राणाने दाखवलेला खेळ वाखाणण्याजोगा होता. या सामन्यात तिने १० विकेट्स घेत इतिहास रचला आहे.




स्नेह राणाने या सामन्यात एकूण १० विकेट्स घेतल्या. सामन्याच्या पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना स्नेह राणासमोर तग धरता आला नाही. राणाने २५.३ षटकं गोलंदाजी करताना ७७ धावांत ८ बळी घेतले. यापैकी तिने चार षटके अशा प्रकारे टाकली की एकही धाव दिली नाही. पहिल्याच डावात तिने आठ विकेट घेतल्यावर या सामन्यात ती किमान दहा विकेट्स घेऊ शकते हे जवळपास निश्चित झाले होते. दक्षिण आफ्रिकेला फॉलोऑन मिळाला, त्यामुळे त्यांना लगेचच फलंदाजीला यावे लागले. स्नेह राणाने दुसऱ्या डावातही दोन विकेट्स घेतल्या दुसऱ्या डावात स्नेह राणाने ४० षटके गोलंदाजी करताना १२ षटकं निर्धाव टाकली आणि १११ धावा दिल्या आणि दोन गडी बाद केले. यासह तिच्या १० विकेट्स पूर्ण झाल्या. दुसऱ्या डावात स्नेह राणाच्या दोन विकेट्सशिवाय दीप्ती शर्मा आणि राजेश्वरी गायकवाड यांनीही प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. पूजा वस्त्राकर, शफाली वर्मा आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतली. स्नेह राणा व्यतिरिक्त झुलन गोस्वामी ही एकमेव भारतीय गोलंदाज आहे, जिने एका कसोटी सामन्यात १० विकेट्स घेतल्या आहेत. भारताने प्रथम फलंदाजी करताना ६ विकेट्सवर ६०३ धावा करून डाव घोषित केला. यामध्ये शफाली वर्माचे द्विशतक आणि स्मृती मानधनाच्या शतकी खेळीचा समावेश आहे.

# भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेत अडकला

**। बारबाडोस । वृतसंस्था ।**

भारतीय संघाने २९ जून रोजी बार्बाडोसच्या मैदानावर झालेल्या टी-२० विश्वचषक २०२४ च्या अंतिम सामन्यात शानदार विजय मिळवला आणि ट्रॉफीवर आपलं नाव कोरलं. विजयाच्या दुसऱ्याच दिवशी संघ भारताकडे रवाना होणार होता. टीम इंडियाला बार्बाडोसमधील खराब हवामानामुळे मायदेशी परतण्यात अडचण येत आहे. बेरिल वादळामुळे बार्बाडोसमधील हवामान खूपच खराब झाले आहे.

हे वादळ लवकरच कॅरेबियन बेटावर धडकणार असल्याचे सांगण्यात येत असून स्थानिक सरकारने याला 'अत्यंत धोकादायक' श्रेणीत ठेवले आहे. त्यामुळे बीसीसीआयलाही संघाच्या मायदेशी परतण्याच्या योजनेत बदल करावा लागला असून अन्य पर्यायांचा विचार करत आहे.

### हवामान खराब झाल्याने विमान सेवा बंद



### भारतीय संघ मायदेशी कधी परतणार?

**बीसीसीआयचे सचिव जय शाह चॅम्पियन टीम इंडियाला चार्टर्ड फ्लाइटद्वारे भारतात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने २९ जून रोजी दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून १७ वर्षांनंतर टी-२० विश्वचषक जिंकला आहे. या विजयानंतर संघ बार्बाडोसमध्ये अडकला आहे. ''संघ इथून (ब्रिजटाऊन) न्यूयॉर्कला रवाना होणार होता आणि त्यानंतर दुबईमार्गे भारतात पोहोचणार होता.**


कॅरेबियनमधील या चक्रीवादळाचा वेग १७० ते २०० किलोमीटर असण्याची शक्यता आहे, अशा परिस्थितीत ब्रिजटाऊनचे विमानतळही ३० जून रोजी रात्री ८ नंतर बंद केले जाऊ शकते, अशी माहिती मिळाली होती. टीम इंडियाचे खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ सदस्यांसह एकूण ७० जणांना तेथून परतावे लागणार आहे, ज्यासाठी आता अमेरिकेतून चार्टर विमानाची व्यवस्था करत आहे, जेणेकरून संघ तिथून निघू शकेल.

# दिनेश कार्तिकवर नवीन जबाबदारी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारताचा माजी अनुभवी यष्टीरक्षक, फलंदाज दिनेश कार्तिकवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये कॉमेंट्री करणाऱ्या दिनेश कार्तिकला टूर्नामेंट संपल्यानंतर मोठी ऑफर मिळाली आहे. दिनेश कार्तिकची आयपीएल संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुकडून मार्गदर्शक आणि फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने सोमवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर ही माहिती दिली. आयपीएल २०२४ संपल्यानंतर दिनेश कार्तिकने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली होती. निवृत्तीनंतर दिनेश कार्तिकने २०२४ च्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये कॉमेंट्री करताना दिसला.

आयपीएल संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिनेश कार्तिकची मार्गदर्शक आणि फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करून मोठी जबाबदारी दिली आहे.



दिनेश कार्तिक आता पुन्हा एकदा विराट कोहलीसोबत ड्रेसिंग रुम शेअर करणार आहे. मात्र, यावेळी दिनेश कार्तिकची भूमिका वेगळी असणार आहे. दिनेश कार्तिक क्रिकेटच्या मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळू शकणार नसला तरी ड्रेसिंग रुममध्ये तो या संघासाठी विजयी रणनीती नक्कीच बनवेल. आयपीएल २०२४ च्या मोसमात दिनेश कार्तिकने विकेट्स राखताना ४ झेल घेतले आणि १ स्टंपिंग केले. आयपीएल २०२४ च्या एलिमिनेटर सामन्यात राजस्थान रॉयल्सकडून पराभूत झाल्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ स्पर्धेतून बाहेर पडला. यानंतर दिनेश कार्तिकने अचानक आयपीएल आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. दिनेश कार्तिकने २५७ आयपीएल सामन्यात २६.३२ च्या सरासरीने ४८४२ धावा केल्या आहेत.

दिनेश कार्तिकने आयपीएलमध्ये २२ अर्धशतके झळकावली आहेत. दिनेश कार्तिकने आयपीएलमध्ये विकेटकीपिंग करताना १४७ झेल घेतले आहेत आणि ३७ वेळा स्टंपिंग केली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दिनेश कार्तिकचे रेकॉर्डही चांगले आहेत. भारतासाठी दिनेश कार्तिकने २६ कसोटी सामन्यांमध्ये १०२५ धावा, ९४ एकदिवसीय सामन्यांमध्ये १७५२ धावा आणि ६० टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ६८६ धावा केल्या आहेत. दिनेश कार्तिकने कसोटी सामन्यात ६३ विकेट्स, एकदिवसीय सामन्यात ७१ आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ३६ विकेट्स घेतल्या आहेत.

# कर्णधार म्हणून हार्दिकच्या नावाची चर्चा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रोहित शर्माच्या जागी हार्दिक पांड्याला भारतीय संघाचा पूर्णवेळ कर्णधार म्हणून नियुक्त करणार का यावर बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी उत्तर दिले आहे. शनिवारी रोहितने भारतासाठी टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर टी-२० फॉरमॅटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. जेव्हा रोहित संघाबाहेर असायचा तेव्हा हार्दिक भारताचा कर्णधार म्हणून काम करायचा. त्यामुळे आता रोहितच्या जागी हार्दिक भारताचा पूर्णवेळ कर्णधार होणार का, असा प्रश्न आहे. टी-२० मधून निवृत्ती घेतल्यामुळे रोहित आता भारताच्या आगामी कोणत्याच टी-२० मालिकांसाठी संघाचा सेटअपचा भाग नसेल. त्यामुळे आता नवीन पूर्णवेळ कर्णधार कोण असणार यावर विचारप्रक्रिया सुरू केली आहे. हार्दिकचा विचार करता त्याने १६ टी-२० सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व केले आहे. त्याने एकदिवसीय सामन्यांमध्ये ३ वेळा कर्णधारपद भूषवले आहे.

हार्दिक पंड्या टी-२० फॉरमॅटमध्ये रोहितचा उत्तराधिकारी असेल अशी चर्चा सुरू असताना, जय शाह म्हणाले की निवडकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर रोहितच्या बदलीची घोषणा केली जाईल. जय शाह म्हणाले, ''कर्णधारपदाचा निर्णय निवडकर्ते घेतील आणि आम्ही त्यांच्याशी चर्चा करून त्याची घोषणा करू. तुम्ही हार्दिकबद्दल प्रश्न विचारला तर त्याच्या फॉर्मवर बरेच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते पण आम्ही आणि निवडकर्त्यांनी त्याच्यावर विश्वास दाखवला आणि त्याने स्वतःला सिद्ध केले आहे.''



### नवीन नेतृत्व

**टी-२० मध्ये भारतासाठी गेल्या काही काळात अनेक खेळाडूंनी कर्णधार म्हणून कामगिरी केली आहे. हार्दिक पंड्या त्यानंतर जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव आणि आता शुबमन गिलकडे भारताच्या टी-२० संघाचे नेतृत्त्व करण्याची जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे भारताचा टी-२० मधील पुढील कर्णधार कोण असणार यावर चर्चा सुरू आहे. टी-२० विश्वचषकानंतर ६ जुलैपासून भारत-झिम्बाब्वेमध्ये ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. नुकताच टी-२० विश्वचषक झाल्यामुळे वर्ल्डकपमधील बऱ्याच खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. तर शुबमन गिलकडे झिम्बाब्वे मालिकेसाठीच्या भारतीय संघाचे नेतृत्त्व सोपवले आहे. झिम्बाब्वे दौऱ्यानंतर, भारत या महिन्याच्या अखेरीस श्रीलंकेचा दौरा करेल, जिथे ते ३ सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहेत. मात्र, या मालिकेचा कर्णधार अद्याप निश्चित झालेला नाही.**

# टीम इंडियाला नवा कोच मिळणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिन्याच्या अखेरीस श्रीलंकेत सुरू होणाऱ्या मर्यादित षटकांच्या मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघाला नवीन मुख्य प्रशिक्षक मिळेल, मात्र, राहुल द्रविडची जागा नक्की कोण घेणार हे स्पष्ट झालेले नाही. द्रविडच्या जागी माजी सलामीवीर गौतम गंभीर भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्त होण्याची शक्यता आहे. क्रिकेट सल्लागार समितीने या कोचपदासाठी मुलाखती देखील घेतल्या आहेत.

दोन नावे निश्चित केली आहेत. मुंबईत पोहोचल्यानंतर त्यांनी जो काही निर्णय घेतला आहे, आम्ही त्यानुसार जाऊ. व्हीव्हीएस लक्ष्मण झिम्बाब्वेला जाणार आहे, परंतु नवीन प्रशिक्षक श्रीलंका मालिकेत सामील होतील.'' भारतीय संघाला २७ जुलैपासून तीन टी-२० आणि तितक्याच एकदिवसीय सामन्यांसाठी श्रीलंका दौऱ्यावर जायचे आहे. मीडिया वृत्तानुसार गौतम गंभीर आणि माजी भारतीय महिला प्रशिक्षक डब्ल्यूव्ही रमन यांना शॉर्टलिस्ट केले आहे. यावेळी जय शाह यांनीही लवकरच निवडकर्त्याची नियुक्ती केली जाईल असे सांगितले आहे.

# यजमान जर्मनीची डेन्मार्कवर मात

**। बर्लिन । वृत्तसंस्था ।**

जोरदार वादळी पावसामुळे सामन्याच्या ३५ व्या मिनिटानंतर खेळ सुमारे २० मिनिटे खंडित झाला, नंतर लढतीस पुन्हा सुरुवात झाल्यानंतर जर्मनीचा धडाका दिसला. त्या बळावर यजमानांनी डेन्मार्कला २-० असे हरवून युरो करंडक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यापूर्वी, बर्लिन येथे झालेल्या राऊंड ऑफ १६ फेरीत स्वित्झर्लंडने २-० असा सनसनाटी निकाल नोंदवत गतविजेत्या इटलीला स्पर्धेतून गारद केले. रेमो



फ्रॉयलर याने ३७ व्या, तर ४६ व्या मिनिटास रुबेन व्हारगास याने केलेल्या प्रत्येकी एका गोलच्या बळावर स्वित्झर्लंडने उपांत्यपूर्व फेरी गाठली. त्यांचा पुढील सामना इंग्लंड व स्लोव्हाकिया यांच्यातील विजेत्या संघाविरुद्ध होईल. डॉर्टमंड येथे खराब हवामानानंतर पुन्हा सामना सुरू झाल्यानंतर जर्मनीने आक्रमक खेळ केला.

५० व्या मिनिटास डेन्मार्कच्या ज्योकिम अँडरसन याचा गोल अवैध ठरला व गोलशून्य बरोबरीची कोंडी कायम राहिली. त्यानंतर जर्मनीने जोरदार मुसंडी मारली.

# कोट्यवधींची कमाई

**मुंबई :** एकीकडे समस्त भारतीय विश्वचषक समन्याचा आनंद लुटत असताना दुसरीकडे डिस्ने आणि हॉटस्टारने मात्र कोट्यवधी रुपये कमावले आहेत. भारत अंतिम लढतीत पोहोचताच स्टार स्पोर्ट्स आणि डिस्ने या मंचावरील जाहिरातींचे दर वाढवण्यात आले.

या दोन्ही मंचांनी मोठी कमाई केली आहे. कंपनीने अंतिम सामन्यासाठी जाहिराती ब्रॉडकास्ट करण्याची फी प्रति १० सेंकद २५ ते ३० लाख रुपये याप्रमाणे वाढवल्याची चर्चा आहे. त्यामुळे त्यांनी चांगलीच कमाई केली.

## विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न पूर्ण झाले....
# जोकोवीचप्रमाणे रोहितने गवत खाल्ले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०२४ चे विजेतेपद पटकावल्यानंतर रोहित शर्माला आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि त्याच्या डोळ्यात अश्रू आले. सहकारी खेळाडूंनी त्याचे सांत्वन केले यानंतर रोहित पत्नी रितिका आणि मुलगी समायरा यांना भेटण्यासाठी इंडियन डगआउटमध्ये गेला तिथून तो बार्बाडोसच्या खेळपट्टीवर गेला आणि खेळपट्टीवर गवत खाताना दिसला.



रोहित शर्माचा पिच ग्रास खात असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला तेव्हा रोहितने ह का केले याचे लोकांना आश्चर्य वाटले. वास्तविक रोहित शर्माचे आयसीसी ट्रॉफी जिंकण्याचे स्वप्न होते. गेल्या वर्षी तो आणि त्याचा संघ दोनदा अंतिम फेरीत हरला होता. ऑस्ट्रेलियाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल आणि वनडे वर्ल्ड कप फायनलमध्ये भारताचा पराभव केला. भारताने टी-२० विश्वचषक जिंकला तेव्हा रोहितने नोव्हाक जोकोविचचा आनंद साजरा करणाऱ्या खेळपट्टीवरील गवत खाल्ले. सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोवाक जोकोविचने विम्बल्डनमध्ये राफेल नदालविरुद्ध विजय नोंदवल्यानंतर नोवाक टेनिस कोर्टचा घास खाताना दिसला होता. १३ वर्षांपूर्वी १९ येथे राफेल नदालविरुद्धच्या विजयानंतर जोकोविचने त्याच्या सामन्यानंतरच्या उत्सवादरम्यान प्रथमच असे केले. त्याने ८ वेळा असा उत्सव साजरा केला आहे. आता रोहित शर्मानेही नोव्हाकची कॉपी करून असाच आनंद साजरा केल्याचे मानले जात आहे. रोहित शर्माने त्याच्या मुलाखतींमध्ये अनेकदा सांगितले होते की त्याला आयसीसी ट्रॉफी जिंकायची आहे.

### रोहितनेही खास पद्धतीने सेलिब्रेशन केले

**रोहितचे स्वप्न पूर्ण झाल्यावर भारतीय कर्णधाराने खास अशा पद्धतीने सेलिब्रेशन केले. त्याने खेळपट्टीचा घास खाल्ला आणि आपल्या कामगिरीबद्दल मैदानाचे आभार मानले २० विश्वचषक जिंकल्यानंतर रोहित आणि कोहलीने २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.**

# भारतीय खेळाडूंवर १२५ कोटींचा पाऊस

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाला बीसीसीआयने १२५ कोटी रुपये देण्याची घोषणा केली आहे. तब्बल ११ वर्षांनंतर भारतीय संघ आयसीसी स्पर्धा जिंकण्यात यशस्वी ठरला आहे. अशा परिस्थितीत देशभरातील आणि जगभरातील कंपन्यांनीही या खेळाडूंवर पैशांचा वर्षाव सुरू केला आहे. विशेष बाब म्हणजे विश्वविजेत्या संघाची एकत्रित ब्रँड व्हॅल्यू सर्व विक्रम मोडू शकते. हा संघ एकटाच आयपीएलच्या ब्रँड व्हॅल्यूशी स्पर्धा करताना दिसत आहे. २० इंटरनॅशनलमधून निवृत्ती जाहीर करणाऱ्या रोहित आणि विराटची ब्रँड व्हॅल्यू दुपटीने वाढू शकते. गुंतवणूक बँक हौलिहान लोके यांच्या मते, आयपीएलचे मूल्य १६.४ अब्ज डॉलर आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, निवृत्त होणारे टी-२० खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या ब्रँड डील जवळजवळ दुप्पट होण्याची अपेक्षा आहे. ते म्हणाले की, शनिवारी चमकदार कामगिरी करणाऱ्या हार्दिक पंड्या, जसप्रीत बुमराह, सूर्य कुमार यादव, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, शिवम दुबे यांच्यासह प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या मूल्यांकनात किमान ५०-७० टक्क्यांनी वाढ होण्याची अपेक्षा आहे. शनिवारी रात्रीपासूनच विविध क्षेत्रातील कंपन्या आणि कॉर्पोरेट कंपन्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर टीमचे अभिनंदन करण्यास सुरुवात केली होती. स्पोर्ट्स मॅनेजमेंट कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, रविवारी सकाळपासून ब्रँडच्या जाहिरातींसाठी विशेषतः बुमराह, पांड्या आणि यादव यांच्यासाठी चौकशी वाढू लागली आहे.ॲजिलिटास स्पोर्ट्सचे सहसंस्थापक आणि सीईओ अभिषेक गांगुली यांनी एका मीडिया रिपोर्टमध्ये सांगितले की, या सर्व खेळाडूंचे व्यक्तिमत्त्व वेगळे आहे. गांगुली म्हणाले की, अनेक नवीन खेळाडू छोट्या शहरातून आणि सामान्य पार्श्वभूमीतूनही येत आहेत. गांगुली म्हणाले की, काही वर्षांपूर्वी केवळ काही खेळाडूच अशा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत असत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)